# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV — AKOLA:—SATURDAY EVENING, AUGUST 7, 1869 — NO. 31

पुस्तक ४ — अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ७ माहे अगस्ट सन १८६९ इ० — अंक ३१


## वऱ्हाडस्टांपकागद.

राजांत आपले मुलखांत स्टांपकागदाचें मोठें उत्पन्न असतें हें इंग्लिश सरकारची वहिवाट आज बहुत वर्षें पाहून लोकांस कळलेंच आहे. वीतभर कागदाची किमत पराकाष्ठा एक पै असेल, परंतु त्याजवर एक शिक्का करून त्याचें एक आणा, दोन आणे चार आणे, रुपया, पांच रु[illegible], इत्यादि लाख रुपये पर्यंतही मनसोक्त घेतात. मग त्या फायद्यास काय पहावयाचें आहे? तोटयाचें कलम मुळींच नाहीं. ही फायद्याची गोष्ट आज बहुत वर्षें आमच्या निजाम सरकारास बारकाव्यानें ठाऊक नव्हती ती हल्लीं ठाऊक झाली आहे तो प्रकार असा.

हा वऱ्हाडप्रांत निजाम सरकारचे मालकीचा आहे सबब यांतील उत्पन्नाचें तें सरकार धनी होय. म्हणून इकडील स्टांप कागदाचें उत्पन्नही त्यांच्या मिळकतीची बाबद होय. असें असतां आज १६ वर्षेंपावेतों निजामानीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांस वाटलें असेल कीं, स्टांपाचा पुरवठा करण्याची जिकीर कोण करितो व त्या किरकोळ उत्पन्नाकडे कोण पाहतो. किंवा बलाढ्य इंग्रज सरकारानीं हा मुलुख आपणापासून घेतला आहे व मालकीप्रमाणें ते वहिवाट करित आहेत तेव्हां आमचे स्टांपाचें उत्पन्न आम्हांस द्या असें म्हटल्यानें देतील न देतील, किंवा रागावतील कोण जाणे अशा मोहगमपोटीं तो मुद्दाच आजवर निघाला नव्हता किंवा निघून मागें पडला होता ठाऊक नाहीं. पण इतकें दिसतें कीं, दिवसानुदिवस इंग्रज सरकारचे स्टांपाचें उत्पन्न वाढत चाललें आहे असें पाहून निजामानीं वऱ्हाडच्या स्टांपाचे उत्पन्न इंग्रजास मागितलें तें त्यांनीं हल्लीं त्यांस दिलें आहे. आतां आगटोबर महिन्यापासून वहाडांत इंग्रज सरकारचे स्टांपकागद चालावयाचे बंद होतील आणि निजाम सरकारानें आपले राजधानींत वऱ्हाडाकरितां तयार केलेले स्टांपकागद येऊन चालू होतील.

या बाबदींत एथील कमिशनर साहेबानीं डिपुटि कमिशनरांकडे नंबर १८ चें नुकतेंच एक सरक्युलर पाठविलें आहे त्यांतील लोकांस माहित होण्यावा मजकूर आम्ही एथें घेतो.

१. हुंडीचे स्टांप आणि टपालाचे स्टांप खेरीज करून बाकी सर्वप्रकारचे खास (म्हणजे विशेषेंकरून वऱ्हाडा लागू असे) ष्टांपकागद पुढें येणारे अकटोबर महिन्याचे पहिले तारखेपासून किंवा त्या पुढील थोडक्याच अवकाशाचे तारखे पासून वऱ्हाडांत चालू होतील.

२. नवीन स्टांप वऱ्हाडांत चालू होण्याचे तारखेपासून (मग ती तरीख जी मुकरार होईल ती) एक महिना पर्यंत जे स्टांप हल्लीं लोकांनीं घेतले आहेत ते ज्या इसमापाशी आहेत त्यांनीं त्या मुदतींत आपल्यापाशी असलेले स्टांप कागद देऊन तितक्याच किमतीचे वऱ्हाड स्टांप घेण्याची त्यांस परवानगी आहे. परंतु ते जे स्टांप दाखल करतील त्यांजवर मजकूर लिहिलेले नसावे व ते स्टांप त्यांणीं या इलाख्यांत म्हणजे वऱ्हाडांत घेतलेले असावे परंतु वऱ्हाडच्या बाहेर विकत घेतलेले सरकारी बादशाही स्टांप जरी कोरे असले तरी ते बदलून दिल्हे जाणार नाहींत. यास्तव अशा प्रकारचे स्टांप तारीख १ अकटोबर पर्यंत जितके उपयोगास लागतील त्यांहून ज्यास्त स्टांप विकत न घेण्याचें शाहणपण लोकांनीं करावें.

३. ज्या अर्थीं पहिले अक्टोबर पासून सुरू होणारे जनरल स्टांप आक्टांतील नंबर १ चे परिशिष्टांत सांगितलेले दस्तऐवजास चिकटणारे स्टांपाची गरज आहे. त्याअर्थीं वऱ्हाडांत तारीख १ अक्टोबर नंतर लिहिलेले असे प्रकारचे दस्तऐवजास वऱ्हाडास लागू असणारे असे प्रकारचे स्टांप लावले याहिजेत. परंतु "बील आफ एक्सचेंज," चेक, आणि पैशाचे बाबदीत दुसरे हुकूम ह्यांजवर ते स्टांप लावण्याची गरज नाहीं. उदाहरणार्थ जो सरकारी स्टांप हल्लीं उपयोगांत आहे तोच स्टांप हुंडीस लागेल मग ती कोठेंही लिहिली जावो परंतु वऱ्हाडांत पावती लिहिली गेली तर तिजला खास वऱ्हाडचा चिकटणारा स्टांप लावावा लागेल.

४. परंतु तारीख १ अक्टोबरचे पूर्वी लिहिलेले दस्तऐवज ते ज्यावेळीं व ज्या ठिकाणीं लिहिले गेले त्यावेळीं व त्या ठिकाणीं चालू असणारे स्टांपावर असले ह्मणजे ते कायम समजले जातील आणि स्टांपाचा जो फेरफार होणार त्यापासून त्यांस व्यंगोप्ति होणार नाहीं.

५. ही व्यवस्था आणि हे सर्व हुकूम स्टांपवेंडरास समजून व व्यक्त करून सांगितले पाहिजेत. आणि ते बरोबर समजले जातील असेविशीं खबरदारी घेतली पाहिजे. नाहीं तर गैरसमज झाल्यास स्टांपाच्या कराचें उत्पन्नाची नुकसानी होईल. वऱ्हाडांत विकत घेतलेले कितीही स्टांप तारिख १ अक्टोबर नंतर बदलून त्याऐवजीं नवे स्टांप घेतां येतील. यास्तव अशा प्रकारें स्टांप बाळगणारे लोकांस नुकसानीचा धोका नाहीं. व्यापार करणारे लोकांस कळावें कीं हुंडीच्या स्टांपाचा कांहीं बदल होणार नाहीं.

६. मेहेरबान फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट साहेबांचे पत्रांतील सहावे फिकऱ्यांत ठरविलेले नियमावरून आह्मी असें अनुमान करितों कीं, सन १८६९ चे २६ वे आक्टाचे (ब) परिशिष्टा अन्वयें ज्या दस्तऐवजास स्टांप पाहिजेत ते दस्तऐवजही, कदाचित मुखत्यारनामा खेरीज करून वऱ्हाड स्टांपावर लिहिले पाहिजेत. परंतु जे दस्तऐवज स्टांपावर लिहिले गेले ते ज्यावेळीं व ज्या ठिकाणीं लिहिले गेले त्यावेळीं व त्या ठिकाणीं ते सही म्हणजे पक्के असतील तर ते स्टांपाचे कराचे संबंधानें सही म्हणून आमचीं कोडतें घेतील. उदाहरणार्थ वऱ्हाडा बाहेर झालेला दस्तऐवज सरकारी (बादशाही) स्टांपावर लिहितां येतो परंतु तोच दस्तऐवज वऱ्हाडांत लिहिण्यास तो वऱ्हाड स्टांप कागदावर लिहिला पाहिजे. हाच नियम पावत्या आणि दुसरे दस्तऐवज ज्याजला चिकटणारे स्टांपाची गरज आहे त्यास लागू आहे. हुंडी, चेक वगैरे ह्यांस इंपेरियल (बादशाही) स्टांपाची गरज आहे. कारण वऱ्हाडचा स्टांप त्या इलाख्याचे बाहेर मानला जाणार नाहीं.

## ईश्वराचा न्याय अतर्क्य!

कोणी मनुष्यानें मोठा अपराध केला व त्याकरितां त्यास योग्य शासन झालें तर आपण म्हणतों कीं न्याय झाला. व कधीं कोणी अपराध न करितां शासन पावला किंवा अपराध करून शासनाव्यतिरिक्त मोकळा झाला तर आपण म्हणतों कीं अन्याय झाला. व यावरून आपणा मनुष्यमात्राचें मत इतकें दिसतें कीं चांगले कृत्यास चांगलें फळ व वाईट कृत्यास वाईट फळ मिळणें हा न्याय व तद्विपरीत घडणें हा अन्याय होय. आणि याच मोठ्या तत्वास अवलंबून जगांतील व्यवहाराची घडण सुरळीत चालली आहे व यामुळेंच उद्योगास मोठें उत्तेजन आलेलें आहे.

आतां दुसरे पक्षीं पहा कीं सर्वकाळ सर्व गोष्टींचा याच एका तत्वावर निर्णय होत असतो असें नाहीं. कधीं यांत चुका होतात; म्हणजे बहुत अपराधी लोक अन्यायी न ठरतां सरकारच्या व लोकांच्या शासनांतून सुटके जातात; कित्येक लोक अपराध न करितां मोठें शासन पावतात, कित्येक लोक बाह्यदेखाव्यानें मोठे नीतिमान व साधु दिसत असतात व आंतून त्यांचें ह्रदय मांगरामोशासारखें कठिण व निर्दय असतें व तें त्यांच्या वर्तणुकीच्या लपेटीनें मरेपर्यंतही कदाचित लोकदृष्टीस येत नाहीं. कोठें चोर, छिनाल, घातकी दुर्वृत्त यांचीं मनेप्सित कामें सहजासहजीं फत्ते होत असतात व त्यावरून त्यांस त्या दुष्कर्माची काडीमात्र भीति न वाटतां किंवा किळस न येतां हौसेनें तीं पुढें चालवावीं वाटतात व शेवटपर्यंत अशा अवांत राहून मोठे सौख्योपभोगी होत्साते ते मरण पावतात. कोणास परोपकाराची वासना नाहीं असे पुरुष लक्षाधीश असून कवडीचुंबक असतात; कोणास परोपकार करण्याची इच्छा असते व गरिबास एक धोतरजोडा द्यावा वाटतो तर त्याच्याच ढुंगणास पाहिला तर पंचा असतो. कोणी अन्नसंतर्पण करावें म्हणून इच्छित असतात पण त्यांसच मध्यान्हास पोटभर भाकरी मिळत नाहीं. कोणी सत्कर्माचरणी व पापभीरु असतात व त्यांच्या मागें अनंत प्रकारच्या व्याधी व संकटें असतात. कोणी रात्रंदिन ईश्वरस्मरण करितात व त्यांवर मोठाले घाले पडतात. इत्यादि गोष्टी पाहिल्या म्हणजे मनाचा निग्रह डळमळतो व सुख आणि चांगलें कशानें प्राप्त होईल याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. व उद्योगाविषयीं मनुष्य उदास होऊन दैववादी होतो.

आतां अनियमितपणानें कोणत्याही गोष्टींत सुव्यवस्था राहत नाहीं हीं मनुष्याच्या कृत्यांतही आपण हमेशा उदाहरणें प[illegible]तों तर मनुष्यांपेक्षां अनंतपट ज्ञानी किंवा मनुष्यास व त्याच्या ज्ञानास आणि या जगतांतील प्रत्येक गोष्टीस ज्यानें जन्म दिला त्या परमेश्वराचे कृत्यांत अनियमितपणाचा किंवा अव्यवस्थितपणाचा लेशही असणार नाहीं हें उघड आहे. पहा कीं त्यानें या जगताच्या घड्याळास एकदां किल्ली दिली आहे तिच्या योगानें चंद्र, सूर्य, तारे, वगैरे अनंत काळ सारखे परिभ्रमण करिताहेत. तेव्हां [illegible] कृत्यांत अनियमितपणा कसा कल्पावा? कल्पू नये. व गोष्टी तर सदरीं लिहिल्याप्रमाणें हमेष घडत असतात तेव्हां हें कोडें उलगडावें कसें याचा मोठा विचार आहे व तो आम्ही आपल्या प्रिय वाचकांपुढें ठेवितों.

आमच्या मतें आम्हांस वाटतें कीं मनुष्य मुळचा फार अज्ञानी आहे व त्याची समज कालांतरें करून वाढत आहे ती आज कित्येक हजार वर्षांनें या मर्यादेस आली आहे व असाच क्रम चालेल तर कालांतरानें ती कांहीं पुढें मजल घेईल व तेणें करून त्यास आणखी कांहीं नव्या गोष्टी कळूं लागतील. तेव्हां कदाचित याचा विचार करणें आतां पेक्षां सुलभ जाईल ही एक कल्पना आहे. व अशा कित्येकांच्या कित्येक निघतील. व ज्यांचें जसें वाचन व समजूत अधिक असेल तशी तो सुयुक्त कल्पना काढील व तशा त्या आम्हांकडे आल्यां असतां आम्हीं त्यांस आनंदानें स्थल देऊं.

सुजन मनुष्यावर दुःखाचा प्रसंग आला असतां फार वाईट वाटतें व त्याच प्रसंगीं ईश्वराचा न्याय मनुष्यास अतर्क्य या विषयीं गोष्टी सुचतात. दोन आठवड्यापूर्वीं रावबहादुर भास्कर दामोदर मुंबईच्या स्मालकाज कोडतांतील जज्ज यांची प्रिय पत्नी निवर्तल्याचें ऐकून आम्हांस फार दुःख वाटलें. भास्कर रावजीचें हे द्वितीय विवाहाचें कुटुंब होतें व तें द्वितीय पुत्रातें प्रसवून एकच महिना झाला असावा इतक्यांत हा घात झाला. भास्कररावजीस पुष्कळ वर्षांपासून आम्हीं ओळखतो. हे सात्विक, खरे, न्यायी, निःपक्षपाती, धार्मिक व ईश्वर भक्त असे आहेत. व आम्हांस वाटतें कीं यांच्या प्रतीचे लोकांत याच्या तोडीचे स

…ाचरणी व ईश्वरतत्पर लोक थोडे असतील. अशांवर अशा प्रकारचा दुःखाचा घाव घालण्यांत ईश्वराचे न्यायाचें समाधान कसें होत असेल त्याविषयीं आपणास कांहीं तर्क होत नाहीं.

अशा प्रसंगीं व इतर सर्व प्रसंगीं इतकेंच मानिलें पाहिजे कीं, ईश्वर न्यायी आहे, त्याची इच्छा प्रबल आहे व तो जें करितो तें मनुष्याच्या बऱ्याकरितांच करितो; म्हणून त्याचे करण्यांत सध्या दुःखरूप दिसत असेल तो भास आहे व परिणामीं सुख आहे. दुखणेकऱ्यास औषध प्रथम कडू लागतें पण त्याचा परिणाम गोड असतो. तसाच प्रकार हा असेल व तो आपणास पुढें कळेल जशी कामाच्या जरुरी करितां प्रथम तारायंत्रांतून संक्षिप्त हकीकत देतात आणि मागून टपालांतून सविस्तर कळवितात तसाच पुढें कळण्याचा हा प्रकार असेल. अशी कल्पना करून दुःखप्रसंगीं मन उद्विग्न न होऊ देतां विच्यारानें तें परमेश्वरीं दृढ करावें हेंच मनुष्य मात्रास योग्य होय.

## पुनर्विवाहाच्या विरुद्धपक्षाची कडेकोट तयारी.

आम्हांस आश्चर्य वाटतें कीं, जुन्या समजुतीच्या लोकांनीं पुनर्विवाहाविरुद्ध अनंत प्रकारचे कट करण्यास मोठीच कंबर बांधिली आहे. एवढा त्यांचा निग्रह होईल अशी कल्पना या पूर्वीं झाली नव्हती.

मुंबईस या कामाकरितां प्रति आठवड्यास सभा भरत असते. या सभेस सहाय करण्याकरितां कोल्हापुराहून शंकराचार्यांनीं एक शास्त्री पाठविले आहेत. ते अध्यक्षस्थानीं बसतात—वर्गणीचो बरीच याद झाली आहे—वर्तमानपत्रें घेऊं लागले आहेत—एका सभेंत असें प्रतिपादन झालें कीं, पुनर्विवाह केलेल्या वेणूबाईच्या पूर्व सासरचीं मनुष्यें बहिष्कृत झालीं आहेत व तीं सभेस सहाय व मोकळीक मागतात. याजकरितां शास्त्रप्रमाणें तिचा घटस्फोट केला पाहिजे व तो ज्या गावीं तिचा पुनर्विवाह झाला त्याच गावीं धर्म सभेच्या खर्चानें व समारंभानें झाला पाहिजे. तसेंच एका शास्त्रीबावानीं "नष्टेमृते" या पुनर्विवाह विधायक वचनावर अन्य ग्रंथांतून १६ प्रकारचे दोष आणिले आहेत. तेही ते पुढील सभेंत सांगणार आहेत.

काशीक्षेत्रीं शास्त्री मंडळीची मोठी सभा होऊन शेदीडशे मंडळीच्या सहीचें छापील पत्र प्रसिद्ध झालें आहे व त्यांत त्यांनीं पुनर्विवाहसंबंधी मंडळीस बहिष्कृत केलें आहे.

रत्नागिरीस शास्त्री लोकांनी सभा करून अशीच बहिष्कृती प्रसिद्ध केली. व त्यांविरुद्ध तेथील हायस्कूलचे मास्तर रा० रा. वामन आबाजी मोडक हे सभा भरवून व्याख्यान देत असतां लोकांनीं ऐकिलें नाहीं व त्यांची जरा टर उडविली.

साताऱ्यास गजेंद्रगडकर शास्त्री यांनीं शुभसूचकांतून रा. रा. विष्णूशास्त्री पंडित यांच्या मागील प्रतिपादनाविरुद्ध आठ कालम उत्तर लिहिलें आहे. व त्यांवर इंदुप्रकाशचे दोन कागद निघाले कांहीं जबाब नाहीं. कऱ्हाडचे रा. रा. विठोबा अण्णा यांनीं ज्ञानप्रकाशांत पत्र छापविलें आहे कीं, विष्णुशास्त्रीयांचे ग्रंथावर पदोपदीं खंडणपर आम्ही दोन ग्रंथ लिहिले आहेत. व त्यांशीं वाद करण्यास सातारा येथें अगर पुणें येथें दोन महिन्यानंतर आम्ही सिद्ध आहोत.

याप्रमाणें प्रतिपक्षाची तयारी होऊन राहिली आहे. आतां पुढें काय होतें पहावें. हा एवढा मोठा कट देश काल वर्तमान पाहून बिचाऱ्या विधवांचे सहायार्थ झाला असता तर किती उत्तम गोष्ट झाली असती? परंतु तसें होत नाहीं यावरून त्यांचें नष्टचर्य संपण्याचा काळ अजून आला नाहीं असें दिसतें. परमेश्वरेच्छा!

## यशवंतराव महादेव.

या सदराखालीं खानदेशवैभवकर्त्यानें भक्कम सहा कालमांहून अधिक मजकूर लिहून आम्हांस खूप शिव्या दिल्या आहेत. खरेंच कां शिव्या नाहीं देणार! त्याच्या तबेती बाहेर आम्हीं लिहिलें; म्हणजे रा० रा० यशवंतराव महादेव मामलेदार यांसाठीं ईश्वरानें परदेशी शिपायाचा अवतार घेतला नसावा अशी आम्हांस शंका आली. ही सहन करण्या योग्य चुकी नव्हे, पण खानदेशवैभव कर्त्याची दयालुता धन्य आहे, तेणेंकरून नुसत्या शिव्यावरच गेलें. अस्तु. आमचा बंधू आम्हांस मुख्य दोष असा देतो कीं प्रथम आपली पकी खात्री करून घेऊन मग टीका करावयाची होती. खरेंच हा मुद्दा पसंत आहे व यावरच या वादाचा निकाल आहे. आमच्या बंधूनें तो मजकूर लिहितांनां आपले स्वतांची तरी किती पक्की खात्री करून घेतली होती तो त्याचेच लेखावरून वाचकांनीं पहावी. तो त्याचा लेख असा —

"ही घडलेली गोष्ट खरी आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. कारण चक्षुर्वैसत्यं. तथापि खोटी आहे असेंही निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. परंतु जरी आम्ही स्वतां पाहिली नाहीं आणि कित्येकांचे अनुभवास आलेली ती आम्हास कळली तरी ती खरी मानावी कीं खोटी मानावी? अनुभाविक गोष्ट वास्तविकरीत्या खरचि मानली पाहीजे,,

काय हें महान तर्कशास्त्र! वा! आमचे चाणाक्ष वाचक या सदरील उताऱ्यावरून समजतीलच कीं आम्हांस शंका येऊन मागें जें आम्हीं आर्टिकल लिहिलें होतें त्याचा उलगडाच झाला.

## CHANDA COAL.

Though the Chanda seam (writes the *Jubbulpore Chronicle*) is the last that has been discovered in the Central Provinces we notice it first, as there can be no doubt that if this measure should turn out so well as has been reported on it, by the geologist specially deputed to examine it, the prospects of the Great Indian Peninsular Railway will be very favourably affected. Specimens of this coal have been furnished to the Great Indian Peninsular Railway and the East Indian Railway Companies for trial. The former has not pronounced favourably on it, and it remains to be seen what the specimen sent up to Jumalpore will turn out like. Probably, as has been suggested, the mere fact of the Great Indian Peninsular heretofore using English coal rendered it improbable that a favourable report could be given by its officers on the Chanda coal, and it may also be noted that the seam has not been worked to any depth as yet. There is not the least doubt on this point, that the seam is of great length whatever its depth and quality may be. The Sawtpoora outcrops wich are to be found in the districts of Nursingpore, Hoshungabad, Chindwarra and Baitool will play a very prominent part in the material progress of the Central Provinces. We regret that the working of both the Pench valley and the Hoshungabad mines was stopped by the falling through of the transaction with a Cawnpore firm in connection with the former; and by unaccountable tardiness of the Great Indian Peninsular Railway Company in regard to the latter. This Company has since been allowed to work the Pench fields gratuitously for two years. The Nerbudda Company is pushing on its operations; the last phase being the occupation of land to lay a line of rail from the mines to the Great Indian Peninsular line which runs into Jubblpore. When we mention the outcrops in the Nagpore and Jubbulpore districts we sum up all the discovered seams, though it is reasonable to expect from geological inferences that many other seams are latent. There is so much to be gamed by the Government in permitting the opening out of the seams which are considered comparatively insignificant, that we would advocate the leasing of such outcrops as that of Lameta Ghat on the lightest possible royalty, if not free of charge. Or, licenses may be given to persons, desirous of quarrying the coal, for a month, six months, or any other period and charges accordingly made on the licenses. There is no hope of the Lameta Ghat mine ever being contracted for by any large Company unless there is proof that the measure will pay; and this cannot be determined until we know more about the extent of the seam. This coal was used by the late Mr. Walker, for burning his bricks, and answered admirably for that purpose. An excellent paper has been put forward recently in India by Mr. Fryar, mining geologist in connection with the geological survey of India, in which he has offered some valuable suggestions for improving the system of coal minig in this country. As the views of a practical man, we hope to see the Government give the widest publicity to it, as there is very much to be learnt from it by many who are now entering upon the great work of coal mining in India.

## Local
## वऱ्हाड.

**अडगाव**— एथें २९ वे तारखेस वकील, नाझर वगैरे कितिएक लोक सरकारी शाळेंत परीक्षेकरितां गेले होते, व त्यांनीं मिठायी वाटली. येथें एक पुस्तकालय व्हावें असाही विच्यार निघाला होता.

**देउळगाव माळी**—एथून पत्र आल्यावरून कळतें कीं तेथील शाळेस जागेची फारच अडचण आहे. गुदस्तां तहशिलदारानीं पाटलाकडून एक गवती छपर करून दिलें होतें तेंही सालमजकुरीं मोडकळीस आलें आहे.

उमरावतीस गेले रविवारीं चांगला पाउस पडला—व्यांकेचे क्याशर मि० घेलाभाई यांची मुंबईस बदली झाली त्यांस उमरावतीचे लोकांनीं मानपत्र दिलें व तें देण्या योग्य नव्हतें असें सत्यप्रकाशकर्ता लिहितो.

अकोलें जिल्ह्यापैकीं अकोट तालुका इलिचपुरा कडे जाणार अशी सुबोधप्रकाशांत वदंता आहे. तिला एथें कांहीं आधार दिसत नाहीं.

खामगावाहून पत्र आल्या वरून कळतें कीं जुलाई अखेर तेथें ८ इंच ६८॥ दोकडे पाऊस पडला. अशी मोठमोठ्या ठिकाणची पावसाची व कापसाचे पेरणीची वगैरे बातमी आमचे मित्र आम्हांस कळवितील तर मोठा उपयोग होईल.

या जिल्ह्यांत खोबरखेडें येथें कालरात्रीं डाका पडला. त्यांत १२ असामी होते त्यानीं ५।६ असाम्यांस जखमा केल्या आहेत. पोलिस सुपरइंटेंडंट साहेब तिकडे गेले आहेत. चोरीस कांहीं गेलें नाहीं असें समजतें.

देऊळगांवराजा—ता० २६ जुलाई १८६९

इकडे पर्जन्य सामान्यच आहे गांवांत रोग तुरळक चालू आहे. आडास अद्यापि पाणी न आल्यामुळें लोकांचे हाल होतच आहेत. तारीख २४ माहे मजकूर रोजीं येथील इंग्लिश मराठी स्कुलांत गुदस्तसालीं परिक्षा झाली त्यावेळेस चांगलीं उत्तरें ज्या मुलांनीं दिलीं त्यांस पुस्तकें बक्षिस वाटण्याचा समारंभ झाला. त्यास या समयास गांवांतील शेटसावकार व सभ्य गृहस्थ मिळून ५० लोक जमले होते. असा बक्षिसें वाटण्याचा समारंभ कधींच झाला नाहीं. प्रथम हेडमास्तर रा. रा. गंगाधर सिताराम शास्त्री यानीं अर्वाचीन विद्यापासून व सरकारी शाळांपासून काय लाभ होतात व त्यांपासून देशांतील व्यापार व अनेक जातीचे धंदे कसे ऊर्जित दशेस येतात यावर सुरस संभाषण केलें. नंतर मे० शेकलाचे पोलिस इन्स्पेकटर यानीं आपल्या हातानें मुलांस बक्षिसें वाटलीं. नंतर शिरस्त्याप्रमाणें विडे वाटून समारंभ खलास झाला. या समारंभाच्या प्रसंगीं अज्ञान राजपुत्राचे मामा व बालाजीच्या संस्थानचे सांप्रतचे कारभारी रा. रा. बाबा साहेब यानीं शाळेंतील हुशार व गरीब मुलांस ५ रुपयांचीं पुस्तकें बक्षीस दिलीं. सदहू गृहस्थाचे अशा स्तुत्य कृत्यावरून हेडमास्तर यानीं आभार मानले, या गृहस्थाजवळ वकील व मसलती रा० दाजी

नारायण करंदीकर हे हुशार व शहाणे अ सल्यामुळें आमचे गांवांत यांचे हातून पुढें चांगलीं चांगलीं कृत्यें होऊन गांव चांगल्या दशेस येईल अशी आशा आहे.

येथें कोणी एक जलमाणूस आणिलें होतें. व तें दाखविण्याबद्दल माणशीं एक पैसा घेत असत. असे त्यास पाच पन्नास रुपये मिळाले. याची आकृती वानरासारखी असून यास शेपुट नव्हतें व पोट मोठें होतें व उंची सुमार दीड हात होती.

एक मनुष्याला पिसें लागलें आहे. व त्याचा मुलगा अज्ञान आणि बायको बाहेरगावीं आहे. अशी संधी पाहून त्याचा भाऊ त्याचे जिनगीची लांबवालांबव करीत असल्याचा बोभाट शुक्रवारांत साळ्याचे आडाचे पाणवठ्यावर ऐकण्यांत आल त्याची दाद लागावी.

**पुसद**— तारीख २३ माहे जुलई १८६९ **नरी कोमटी लोकांनीं ब्राम्हण भोजन घातलें तथापि अद्याप पावेतों साधुमहराजानीं** प्रसन्न होऊन मेघराजानें सुरवात केली नाहीं. प्रातःकाळीं थंडी पडते दुपारीं ऊन पराकाष्ठेचें पडते सारांश पावसाळासा अगदीच भासत नाहीं. जसे चैत्र वैशाखाचे दिवस आहेत असें वाटतें. अशा चिन्हावरून पुढें इकडे काय होणार हें वाचकांचे सहज ध्यानांत येईल. अस्तु. जगन्नियंत्या परमेश्वराला काळजी सर्व प्राणिमात्रांची आहे. तर त्याजला अनन्य भावेंकरून सर्व लोक शरण गेले असतां सर्व संकटांतून तो वाचवील ह्यांत संशय नाहीं. मुलीचे शाळेचे कमिटीचे प्रेसिडेंट रा॰ रा॰ लक्ष्मणराव बळवंत देशमूख हे, कमिटीचे सभासद मास्तराचा निमेपगार देतील अशा बद्दल सरकारास जामीन झाले आहेत. आतां सरकारांतूनथोडेच दिवसांत सहाय खचित मिळेल. ह्यांत संशय नाहीं. मेहेरबान डिपुटी कमिशनर फिटजरलड साहेब बहादूर यांचा या शाळेला पक्का आश्रय आहे. शाळेंत मुलींचा अभ्यासही चांगला चालला आहे. रा. रा. लक्ष्मणराव व विनायकराव इंग्रजी मराठी शाळेचे हेडमास्तर ह्यांनीं थंडे दिवसांपूर्वीं परिक्षा घेतली त्यांत मुली व बनी ह्यांनीं उत्तरें फार चांगलीं दिलीं. एक दोन दिवस झाले पोलिस इन्स्पेक्टर गुलाम मोहिदीन कलगांव महागांवाकडून फिरून एथें आले. हे फार मेहेनती दिसतात. लोकांची मालमत्ता वगैरे रक्षणाकडे ह्यांची फार दक्षता आहे. ह्यांचा पोलिसावरचे लोकांवर धाक जसा असावा तसा आहे. नायबतहशिलदार रा. रा. भिवाव अनंत हे इजाऱ्याचे गांवांसंबंधी जंगल खात्याच्या हद्दी नमुद करण्याकरितां बाहेर गेले आहेत. हे गृहस्थ फार मेहेनती हुशार व आपले कामांत दक्ष आहेत. रा. रा. रामचंद्र अनंदराव असिस्टंट मास्तर यांची बदली मंगरूळ पिरास होणार होती. परंतु तूर्त राहित झाली असें ऐकतों. दोनचार विद्यार्थी मोठे झटून अभ्यास करीत आहेत. आणि त्यांचा इरादा येते नोवेंब महिन्यांत [illegible] परिक्षेस जाण्याचा आहे ईश्वर करो आणि [illegible] इरादा परिपूर्ण होवो. **पुसद तहशील कचेरींत फार [illegible] आहे असें दिसतें. कारण चेहेमीं रात्रीं ८।९** वाजल्याशिवाय तहशिल्दार व कारकून लोक उठत नाहींत. [illegible] आहे कीं जसें मुंबई इलाक्यांत न्यायाधीश खात्यांत जाईंट जज्ज नेमतात तसें जाईंट तहशीलदार सरकार मेहेरबान होऊन नेमतील तर बरें होईल. म्हणजे नबाब साहेबांस व कारकून लोकांस असें दुःख भोगावें लागणार नाहीं व रयत लोकांचें कामाचा निकाल लवकर होत जाईल. लिहिण्यास संतोष वाटतो कीं, ह्या तालुक्यांतील एक थोर गृहस्थ आपले विधवा मुलीचा पुनर्विवाह करण्यास तयार आहे परंतु वर मात्र चांगला मिळावा आणि रा. रा. नाना साहेब देशमुखासारखे बहुश्रुत व विद्वान लोक अनकूळ व्हावे. येथें महागाई फार होत चालली आहे ह्याजकरितां सरकार नौकर लोकांस महागाई मुंबई इलाक्याप्रमाणें देण्याची सरकार मेहेरबानी करील तर बरें होईल. कारण ह्या लोकांची प्राप्ती नियमित असते आणि खर्च तर व्हावयाचा तितकाच झाला पाहिजे तर ह्या बिचाऱ्यांकडे सरकार पूर्ण नजर पुरवील अशी आशा आहे.

**पुसद** तारिख ३० जुलाई सन १८६९ ऐथें पटकीचा उपद्रव चालू आहे. परमट खात्याकडील मुनशी तारिख २८ रोजीं मरण पावला त्याचे मरणामुळें बहुत लोकांस दुःख झालें तो फार भला गृहस्थ होता व आपले कामांत फारच चांगला असे. पटकीचा उपद्रव कमी होण्याकरितां रा॰ रा॰ भगवत् भक्त केशवरांव भाऊ तहशिल कचेरींतील आकौंटंट, नानासाहेब देशमुख वगैरे मंडळीनीं ब्राम्हण अनुष्ठानास बसविले आहेत. आतां पाहू कसें काय होतें तें. पावसाची अजून हाकाहाक आहे तशीच आहे. स्त्रिया कैदी मात्र येथें ठेवाव्या व पुरुष वाशीमचे तुरुंगांत एकदम रवाना करित जावे येविषयीं डि॰ क॰ साहिबाचा नबाब साहिबास हुकूम आला आहे. असें ऐकतों. मंगरूळपीर हा एक नवीन तालुका होणार अशी दाट बातमी आहे व त्यावर डि॰ क॰ साहेबांचे चिटणीस रा॰ रा॰ कृष्णाजी गोविंद ह्यांची नेमणूक होणार. असें झाल्यास लोकांस फार संतोष होईल ह्यांत संशय नाहीं. हे गृहस्थ चांगले इंग्रजी शिकलेले, कायद्यांत निष्णात व स्वभावानें सुशील आहेत. आतां मशारनिल्हेची जागा डि॰ क॰ साहिब याच तालुक्यापैकीं कोणी इंग्रजी मास्तरास देतील तर त्यांचा मोठा लौकीक होईल. तहशील कचेरींतील कारकून रात्रौ बसण्यामुळें फारच कंटाळले आहेत, कित्येकांनीं तर अशीं उत्तरें दिलीं कीं आपलें ठीकच आहे. आपणास सरकारचा मशालजी घरापर्यंत पोचवण्यास येतो आणि आम्हांस काळोखी रात्रीं ठेचा खात खात घरीं जावें लागतें. आतां आम्ही सरकारास अशी विनंती करितों कीं जाइंट तहशीलदार लवकर नेमावा अगर नायब तहशीलदारास फौजदारी व दिवाणी मुकदमे फैसल करण्याचा अखत्यार द्यावा म्हणजे सर्व यातना दूर होतील. मशारनिल्हे ह्यानीं चहूंकडचीं वर्तमानपत्रें येथें घेण्याचें बरेंच मनावर घेतलें आहे असें दिसतें आतां पाहूं मुख्य तहशीलदार कोणकोणतीं पत्रें घेतात तीं. निदान पांच साहा घेतीलच घेतील ह्यांत संशय नाहीं. हे विद्यामृताचे फारच भुकेले आहेत. ह्यांनीं उतारवय असतां गणिताचा मोठा अभ्यास चालविला आहे. रा॰ रा॰ विनायकरावजी येथील इंग्रजी व मराठी हेडमास्तर ह्यांनीं पंध्रा दिवसांची क्याज्युएल रजा मिळण्या विषयीं मेहेरबान एटकीन साहिब इजुकेश॰ इ॰ याजकडे अर्ज केला आहे. आतां आ साहेबाचा मंजुरीचा हुकूम आला म्हणजे मास्तर ठाण्याभ जाणार आहेत.

## अकोला.

आतांशी रात्रौ गस्तीचि कामीं पोलिसाची हुशारी बरी दिसून येतें. व असे हमेष ते आपले कामांत दक्ष राहतील तर त्यांस भूषण, लोकांस सुख व चोरास धाक आहे.

आमच्या एथील नदीच्या पुलास आरंभ होण्याचा सुसमय एकदाचा प्राप्त झाला; आम्हांस या विषयीं बहुत वेळा लिहावें लागलें पण तो शीण आतां राहिला नाहीं. पुलाच्या कामाकरितां दगडाच्या राशी नदीच्या काठीं येऊन पडूं लागल्या आहेत.

कमिशनर साहेब सडे स्वारीनें बाहेरगावीं गेले आहेत.

या आठवड्यांत सेशन झाले त्यांत ५ मुकदमे होते त्यांची हकीकत पुढील अंकांत देऊ.

या आठवड्यांत पर्जन्य काल सकाळीं थोडा पडला पण चांगला पर्जन्य पाहिजे म्हणून बोभाट आहे. महागाई होत चाललीं आहे.

गावांतील ज्वराची साथ आहे तशीच आहे. अकोला शहर [illegible] चाललें आहे. त्या मानानें गावठी वैद्य एथें दोन च्यार कांहींतरी असावयाचे परंतु एकही नाहीं ही मोठी न्यूनता होय. व आमची शिफारस आहे कीं जवळपास निराश्रित कोणी मध्यम थर नेटिव वैद्य एक दोन असताल तर त्यानीं या प्रसंगीं चटादिशीं येऊन अकोल्यास वस्ती करावी. त्यांचें चांगलें चालेल व लोकांस त्यापासून बहुत उपयोग होईल. अकोल्यास सिविल आस्पिटल व धर्मार्थ दवाखाना अशीं दोन स्थळें आहेत तीं नदी पलीकडे आहेत व त्यांवरील अधिकारी एक युरोपियन व एक तैलंगअय्या मिळून दोघही मराठीचे शून्य वाकबगार आहेत.

पलटणीचे लोक व पोलिसचे लोक यांजमध्यें आगीचे प्रसंगीं मागें मोठें भांडण झालें होतें त्यावरून हैद्राबादेस ठराव झाला कीं अकोल्यास पलटणीची तुकडी असते तिजवरील येक युरोपियन कामदार हमेशा अकोल्यास राहावा.

---

## Epitome of News.
## वर्तमानसार.

---

रेलवे— जबलपुराकडील नर्मदे वरील आगगाडीचा पूल तयार झाला व त्यांवरून वाफेचें यंत्र एक वेळ चालवून पाहिलें व आतां जबल पुराकडून भुसावळेकडे येणाऱ्या लोखंडी सडकेचें काम एक वर्षांत पुरें होऊन आगगाडी जाऊ येऊ लागेल. सोलापुरच्यापुढेंही कृष्णाकाठापर्यंत लोखंडी रस्त्याचें काम झपाट्यानें चालू आहे व तें पुढील जून महिन्यापावेतों पुरें होईल व मद्रासेपासून गुटी पर्यंत २९५ मैल लोखंडी रस्ता तयार आहेच मग सारी कृष्णा नदी पासून गुटी पर्यंत १०० मैल खांड राहते. कृष्णेच्या पुलास अजून आरंभ नाही. मद्रास रेलवेकडे तुंगभद्रेचा पूल बांधण्याचें काम चालू आहे.

पुण्याची लायब्ररी बंद होणार म्हणून बातमी प्रसिद्ध झाली होती ती अजीबाद खोटी ठरली-

लेफ॰ एस बार्बिंगटन यास जी आय पी रेलवेचे पोलीस सुपरिंटेंडेंट नोमिले·

माळव्यांतील अफू जकात चुकवून गुपचुप नेली जाते अशा बद्दल सरकारचे सालीना सुमारें ६० लक्ष रुपयांचें नुकसान होतें- असा बोभाट झाला आहे व मुंबई सरकार कांहीं बंदोबस्त करीत आहे-

रजेचे अर्ज करणें ते कामदारानीं पोष्टपेड पत्रांनीं करीत जावे असा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे.

मुंबईस तांदुळ इतके दिवस कलकत्याकडून मात्र येतअसत परंतु अलीकडे सयाम, ब्रम्हदेश वगैरेकडून पुष्कळ जाहाजें तांदुळाचीं मुंबईस भरून येतात असें समजतें.

अक्कलकोटचे राजांनीं आपले एक दोन कारभारी कांहीं तक्रारी वरून काढून टाकिले

पुण्याचे स्त्री नार्मल स्कुलाकरितां डफळे सरकारचे कुटुंबानीं ६०० रुपये दिले.

पतियाळचे राजापासून इंग्रज सरकारानें ४० लक्ष रुपये कर्ज काढून त्याचे फेडीकरितां लोत काढलें आहे.

खानदेश, सोलापूर, नगर व ठाणें जिल्ह्यांत [illegible] फार आहे.

नेपाळचा राजपुत्र धीरेंद्र विक्रम याजवर खटला होऊन त्यास एक वर्षाची कैद व ६००० रुपये दंड झाला आहे व त्यावर त्यानें वायव्य प्रांताचे हाय कोर्टास अपील केलें आहे.

मारवाड देशांत दुष्काळ पडला आहे तिन वर्षें होतआलीं पाऊस नाहीं- तिकडील दुःखित लोकां करिता मुंबईस वर्गणीची याद सुमारें १४००० रुपयांची झाली आहे

कलकत्ता हायकोर्टचे चीफ जस्टीस सर बार्नस पिकाक विलायतेस जाणार व त्यांचे जागेवर अन॰ बेस्ट्राप साहिब होणार अशी वदंता आहे.

पुण्यास महामारीचा उपद्रव झाला आहे.

मुंबईस फ्रामजी नसरवानजी पाटेल यांचें कुटुंब मरणपावलें तिसरे दिवशीं त्यांच्या स्मरणार्थ रुपये ११६०० धर्मार्थ खरचले.

रायपूर येथें आठदाहा पाऊस बरेच पडले तेणें करून आतां धान्याची व्यासी सुरू आहे. येथील सेटलमेन्ट आफीसाचें काम संपलें. आता पाहिली अगस्ट पासून पटवारी लोक आपले पटीवर जातील येथें तारीख २० जुलई रोजीं एके बैराग्यानें सेटलमेन्ट कचेरीचे समोरील तिवारीचे विहिरींत जीव दिला चौकशी अंतीं जीव देण्याचें कारण असें समजलें कीं तो चार दिवसाचा उपवासी होता तेव्हां अन्न मिळेन म्हणून त्यानें जीव दिला.

येथील जेलखान्यांतून एक कैदी पळून गेला त्याच्या शोधास्तव कांहीं स्वार व शिपाई पोलिस सुपरींटेंडेंट यांनीं पाठविले आहेत अद्याप शोध लागत नाहीं.

## पुनर्विवाहफंडाचा गैरउपयोग.

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

वि० वि० महाराज, पुनर्विवाहोत्तेजक सभेची, तिच्या कामाची, व पैशाच्या व्यवस्थेची वगैरे माहिती आपणास आहेच. मी त्याविषयीं आपणास सांगणें म्हणजे "आजोबास नातवानें शिकविणें,, याप्रमाणें होय. तथापि माझे मनांत जो थोडा विच्यार आला आहे तो जर प्रसिद्धीस आणिला नाहीं तर तो खरा खोटा तरी कसा समजावा?

गेल्या इंदुप्रकाशांत लिहिलें आहे कीं पुनर्विवाहोत्तेजक सभेनें जून महिन्यांत पुनः सौभाग्यवती झालेल्या वेणूबाईला आपले फंडांतून २००० रुपये देण्याचा ठराव केला. हे रुपये पेढीवर ठेवून मरेपर्यंत ती, व तिच्या मागें तिला पोरें झाल्यास तीं, यांनीं या रकमेचें व्याज खावें.

या पुनर्विवाहोत्तेजक सभेच्या २।४ महिन्यांतील घाटाघाटींत काय निष्पन्न झालें हें पाहिलें तर बहुतेक हिंदु राष्ट्राचा विरुद्ध कट झाला या खेदकारक गोष्टी शिवाय आंनदरूप कांहीं झालें आहे असें मला प्रथमदर्शनीं वाटत नव्हतें परंतु आतां विच्यार करितां करितां एक गोष्ट दिसून आली ती ही.—

मागून पुढुन किंवा डबल सौभाग्यवती झालेल्या आमच्या वेणू ताईची मात्र झाल्या गोष्टींत पराकाष्ठेची चंगाळ झाली. एक तर वैधव्याचेव दुःखाचे दिवस गेले, दुसरें तिचे ऐनतारुण्याचे भरांत तिला नवा नवरा मिळाला. तिसरें, मुंबई सारख्या राजधानींत बादशाहाच्या बिबीप्रमाणें मोठया थाटमाटानें तिचें लग्न झालें. व चवथे हें कीं, २००० रुपये तिच्या जात निसबतीस बक्षीस मिळाले. आतां नवरा दीन दुबळा किंवा कसाही मिळाला तरी तिला दाणा पाण्या करितां कोणाकडेस याचना करावयास नको. इतक्या दृष्टीनें पाहातां पूर्वयोग असा दिसतो कीं बाईचा पूर्वपती मेला तेव्हांपासून तिचें थोडीं वर्षें वाईट झालें खरें पण आतां त्या वाईटाच्या शतपट चांगलें होऊन केवळ सुखाच्या सांगडीवर घट्ट छाती देऊन ती अक्षय सुखी झाली आहे.

हें चांगलें झाल्या बद्दल मला संतोष वाटतो. कारण दुःखी कोणी असूंनये व सर्वांचें चांगलें असावें. म्हणून वेणूबाईच्या पहिल्या तीन गोष्टींकारितां मी बालंबाल खष आहे. चवथी गोष्ट कमिटीनें तिला २००० रुपये दिल्याची मात्र मला संमत नाहीं, व मला वाटतें कीं बहुत निःपक्षपाती लोक याकरितां कमिटीस टपका देतील.

मागें वे० शा० रा० विष्णुशास्त्री पंडित यांनीं विधवांच्या लग्नावर एक ग्रंथ केल्याबद्दल कमिटीनें त्यांस एक हजार रुपये बक्षीस देण्याचा ठराव केला होता त्याबद्दल चर्चा झालेली तुमच्याच पत्रांत मीं वाचली आहे. व पुढें शास्त्रीबावानीं ते रुपये घेण्याचेंही नाकारलें. तसें मीं म्हणतों कीं वेणूबाईस फंडांतील दोन हजार रुपये देण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. एक तर तिचा भाऊ तालेवार व शंभर रुपयांचा बडा नोकर, त्याचा घबाड वशीला, तो वैधव्यपणीं तिला पोशित होता व लग्न न होतें तर मरेपर्यंत पोसताच. दुसरें, तिचें लग्न होऊन तरुण नवऱ्याचे हातांत ती गेली व तो असा कांहीं वेडा टोणपा पाहिला नसेल कीं त्याला आपल्या बायकोचेंही पोट भरतां येणार नाहीं. तिसरें, पुनर्विवाहाचा मार्ग तिच्याच प्रतापानें निघाला तेव्हां नवऱ्याशिवाय राहण्याची काळजी म्हणून तिला उरलीच नाहीं. व चवथें, पुनर्विवाह कमेटीनें तिच्या लग्नाचा खर्च हजार दीड हजार रुपये केलाच तेव्हां आणखी हे दोन हजार रुपये कमिटीनें कां खाडयांत टाकिले? कमिटीच्या मनांतून आतां आणखीं कांहीं विधवांचीं लग्नें करावयाचीं नाहींत काय? व असेंतील तर या २००० रुपयांत आणखी दोन लग्नें टोलेजंग होऊन दोन विधवा पुनः सौभाग्यवती झाल्या असत्या. किंवा २००० रुपये काशी वगैरे क्षेत्रीं पाठविते तर शास्त्रांच्या नव्या टंकशाळांतून कांहीं अनुकूल शास्त्रार्थ आले असते. व हे कांहीं न होतें तर बहिष्कृत झालेल्या मंडळीस निदान प्रायश्चित्तास तरी हे रुपये उपयोगी पडले असते. परंतु हें कांहींच करावयाचें नसून कमिटीचे मनांत रुपये संपवावयाचें असून पुनर्विवाहाख्यानाची इटकुली मिटकुली गोष्ट संपवावयाची असेल तर मग ती पाहिजे तसें करण्यास मुखत्यार आहे कळावें हे विनंती.

एक बारीक पहाणारा.

*_* वेणूबाईला २००० रुपये दिले हे कमिटीनें गैर केलें नाहीं असें कित्येक प्रकारानें सांगतां येईल व तितकें न सांगितलें तरी इतकें सांगणें बस आहे कीं, वेणूबाईच्या स्वतांच्या कमाईचेच ते रुपये आहेत. कांतर तिचा पुनर्विवाह झाल्याच्या संबंधानेंच ते रुपये मिळालेले आहेत.

व. स. क.

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि० वि० खालीं लिहिल्या चार ओळीस आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा करितों. मी वऱ्हाड प्रांतांत फिरत असतां सरकारचें विद्या वृद्धीकडे दिवसेंदिवस अधिक लक्ष्य आहे असें दिसून आलें. परंतु आश्चर्य वाटण्यासारखी एक गोष्ट दिसून आली ती ही कीं, यांप्रांतीं शाळाखात्याबद्दल बराच खर्च असून त्याबद्दल शेतकरी लोकांवर शेकडा रुपाया प्रमाणें लोकल सेस ही बसविला आहे असें असून सरकार सर्व शेतकऱ्याच्या मुलापासून दोन आणें फी व च्यार आणे फी घेतें. मुंबई इलाख्यांत सातारा, सोलापुर, नगर, खानदेश वगैरे जिल्ह्यांतही शेतकरी लोकांस लोकल सेसबद्दल पैसा द्यावा लागतो परंतु त्या जिल्ह्यांतील लोकांपासून सरकारानें अर्धा आणा फी घेण्याची वहिवाट ठेविली आहे यामुळें तिकडे हल्लीं पाहिल्यापेक्षां ज्यास्त मुलें शाळांनिहाय झाल्ीं आहेत. मला वाटतें कीं तिकडे लोकांला विद्येची विशेष गोडी असून फी कमी ठेविली आहे व इकडे लोकांला तर विद्येची मुळींच आभरुची नसून फी ज्यास्त ठेविली आहे जर इकडे तिकडच्या सारखा फीचा दर ठेवतील तर मुलांची संख्या खरोखर ज्यास्त होईल. शिवाय प्रत्येक मुलांपासन दोन आणे किंवा च्यार आणे फी घेतल्यापासून सरकारच्या एवढ्या मोठया खर्चास म्हणण्वासारखी मदत होत असेल असेंही नाहीं करितां याजकडे जर विद्या खात्याचे अधिकारी डाक्तर सिंक्लेर साहेब लक्ष्य पुरवितील तर लोकांचें कल्याण होऊन विद्यावृद्धी ज्यास्त होईल व मुलांची संख्या अधिक वाढेल. कळावें पत्र विस्तार होईल सबब पुरें करितों. तारिख २९ माहे जुलै सन १८६९

एक सूक्ष्म दृष्टीनें पाहणारा.

---

## जाहिरखबरा

नोटिस—अमृता व हणमंता वल्द बहिरजी पाटिल मौजे मांडवें तालुके बाळापुर जिल्हा अकोलें यास देण्यांत येते कीं तुम्हीं आमचे दुकानचीं खाते बाकी मुद्दल रुपये १७०८४८६ एकशें सत्तर चार आणे साहावे रुजु मिती कार्तीक शुद्ध प्रतिपदा संवत १९२३ व सवाई प्रमाणें व्याज देणें आहा तरी ही नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत आणून देणें. न दिल्यास कायद्या प्रमाणें तजवीज करूं कळावें तारीख २८ जुलै सन १८६९ इ०

(सही) प्रेमसुक नथमल्ल दुकान देऊळगांव साकरशा दस्तुर खुद.

---

नोटिस— पीरखा वल्लद सुलतान खा अतार राहणार मौजे मळसूर तालुके बाळापुर जिल्हा अकोलें यांस देण्यांत येते कीं तुम्ही आमचे दुकानचा कापूस दीड खंडी तीन मण १॥३ देणें आहा तो ही नोटिस पोंचल्या पासून तीस ३० दिवसांचे आंत आणून देणें. नाही पेक्षां कायद्या प्रमाणें तजविज करण्यांत येईल कळावें तारीख २८ जुलै सन १८६९ इ०

(सही, प्रेमसुक नथमल्ल दुकान देऊळगांव साकरशा दस्तुर खुद.

---

नोटिस—रतनलाल भवानीराम मारवाडी रहाणार कसबे कुरणखेड तालुके अकोलें याशी नोटिस देणार टिकाराम वल्लद सखाराम तुपकरी तुमची नोटिस आली ती पावली तुम्हीं तुप मण २॥-८॥ साडेबारामण अर्धाशेर लिहिलें त्यांस तुमचें तूप आम्हाकडेस साडेदहामण पाचशेर आहे व आमचे रुपये ७८८१० अठ्याहातर दाहा आणें तुम्हांकडेस आहेत तरी तुपाचे दाम रुपये ७९८११ एकुण ऐंशी रुपये अकरा आणे झाले. पैकीं आमचे रुपये वजा जातां तुमची बाकी आम्हाकडेस एक रुपाया एक आणा निघाली ती घ्यावी. तुम्ही फिर्याद कराल तर तुमचा खर्च तुम्हासच पडेल व आमचा खर्च जो होईल, तो ही तुम्हांसच देणें पडेल याशिवाय धड्याचा कटिता अकोले चाली प्रमाणें घेऊं कळावें तारीख ३ माहे आगष्ट सन १८६९ इ०

(सही) टिकाराम वल्लद सखाराम तुपकरी कुरणखेड दस्तुर खुद.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आक्टोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सरूकेलें त्यास वर्ष होऊन गेलें तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

आक्ट.
सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतीले न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आण व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास··· ··· | ६ | ० |
| सालअखेर ··· ··· ··· | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· ··· | ३ | ८ |
| सहााही अखेर ··· ··· | ४ | ० |
| ळफुटक एव अंकास ··· ··· ··· | ० | ९ |

या शहर बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ अगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सु: तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

---

नोटिस वगैरे छापण्याचे दर.
१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळी एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV | AKOLA:—SATURDAY EVENING, AUGUST 14, 1869 | NO. 32

पुस्तक ४ | अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १४ माहे आगस्ट सन १८६९ इ० | अंक ३२

## पुस्तकाची पोंच.

अवलिया नामक कादंबरी.

पुण्याच्या रेल्वेकडील तारायंत्रावरील सिग्नलर रा० विनायक बाळकृष्ण दामले यानीं अवलिया अथवा मानी स्वभावाचा दारूण परिणाम या नावाची कादंबरी अथवा मनोरंजक कथा नवीन रचून ज्ञानप्रकाश छापखान्यांत नुकतीच छापून प्रसिद्ध केली आहे. तिची एक प्रत त्यांनीं आम्हांस नजर पाठविली ती आनंदानें ग्रहण करून आम्ही त्यांचे आभार मानितों.

या पुस्तकास अवलिया नाव ठेवण्याचें कारण असें आहे कीं या गोष्टींत श्रीधर पंत नावाचें जें मुख्य पात्र आहे तें महत्संकटांतून व मरणाच्या यातनेंतून अवलियाच्या चातुर्यानें दुःखविमुक्त होत्सातें चिरकाल सुखी झालें आहे. व त्या योगानें हें नाव या पुस्तकास उत्तम योजिलें आहे असें सर्व गोष्ट वाचल्यावर लागलेंच मनांत येतें.

या पुस्तकांतील गोष्टीचा सारांश असा आहे कीं श्रीधर पंत हा मुलगा लहानपणापासून चांगला हुशार, बुद्धिमान, व चंचल असतां गर्विष्ठपणाची एक द्वाड खोड त्याच्यामध्यें जडली. त्यामुळें इतर मुलांशीं त्याचें मेतकूट न जमता तो एकलकोंडा व मोठा डौली असा झाला.

लोकांनीं आपणास सभ्य म्हणावें यावर त्याचें अतिशयित लक्ष असे व याकरित तो लहानपणापासूनच थोर थोर मंडळींत जाई, मित व बहुमानार्थी बोले. अभ्यासाच्या पुस्तकाखेरीज साधारण ज्ञानाचीं पुस्तकें देखील तो वाचित नसे त्यामुळें व्यवहार ज्ञान त्याच्यामध्यें कांहीं शिरलें नाहीं. त्याची बायको मोठी सुलक्षण व सुरूप होती परंतु ती अल्लड व भित्री फार आणि याचा प्रभाव मोठा तीव्र म्हणून त्याच्या वाऱ्यास ही ती कधीं उभी राहत नसे. समवयस्क मुलींत व लगत्याच्या मुलांत ती लहानपणीं खेळत असे तें देखील याला आवडत नसे. त्याला वाटे माझ्याकडे वाकडी नजर करूनही ही कधीं पाहत नाहीं आणि मुलींत खेळते हें काय? पण तें त्या बिच्यारीच्या गावींहि नव्हतें. पुढें ती ऋतुमती झाली तेव्हां फलशोभनाच्या प्रसंगीं रात्रौ भित्रेपणामुळें तिनें लाजाळूपणा केला त्यामुळें श्रीधर पंताचें पित्त फारच खवळून तिच्या चालीरितीविषयीं दुष्ट शंका त्याच्या मनांत आली. व त्या दिवसापासून त्यानें दुखणें घेतलें व पतिरायाची तब्बेत अशी गरम कशानें झाली या काळजीनें व भित्रेपणानें तिचीहि प्रकृति बिघडली; आणि दोघें झुरणीस लागून मरणोन्मुख झालीं.

महादेव म्हणून एक श्रीधर पंताचा मित्र होता तो श्रीधरपंता प्रमाणेंच हुशार असून व्यवहार जाणणारा फार चांगला व मर्मज्ञ असे व याचे दुर्गुण तो जाणत असून ते काढावयाचा प्रयत्न करीत असे. महादेव याचे घरांत अगदी घरचे लेकरा सारखा वागत असे. व त्यामुळें साधारण श्रीधर पंताची बायको वगैरे त्याशीं बोलत असत. परंतु श्रीधरपंताच्या खुनशी स्वभावास हें न आवडून त्याविषयीं त्याचे मनांत दुष्ट बुद्धी उत्पन्न झाली. व एके दिवशीं संधी पाहून त्यानें महादेवाला विहिरींत लोटून दिलें व आपण गुपचुप माघारा आला. पुढें त्याच्या दुखण्यांतही ही गोष्ट त्याचे जिवास खात असे. ब्रम्हहत्येचें पातक त्याच्या दृष्टीपुढें उभें राही व तेणें करून तो आज मरेल किंवा उद्या मरेल अशा थरावर येऊन ठेपला.

हें पुत्राचें दुःख सहन न होऊन श्रीधर पंताचा बाप नारायण शास्त्री परागंदा झाला. त्यावरून श्रीधरपंताचे आईस दुप्पट काळजी उत्पन्न झाली. नंतर एके शेजारणीचे सांगीवरून ती एका अवलियाचे दर्शनास गेली. त्यानें हिची हकिकत ऐकतांच मार्मिकपणानें शिष्याकडून एक चिठी लिहविली व बाईचे हवाली करून मुलास वाचावयास द्यावयास सांगितलें. त्या चिठींत त्याला अंतर्यामींच्या खुणा पोचल्या कीं बायकोच्या जारपणाची कल्पना मनांत आणिलेली सर्वथैव खोटी आहे. महादेव निर्दोष व खरा मित्र असतां, त्याला विहिरींत लोटलें हें फार अनुचित केलें. याचा पश्चात्ताप पावावा, व महादेव मेला नाहीं, जीवंत आहे हें समजावें. ही चिठी पोचतांच त्याच्या मनाच्या ठायीं कांहीं नव्या प्रकारचे तरंग आले. व तो नवीन शिकलेला, सुधारलेल्या मताचा, व अवलिया वगैरेंवर भरवसा न ठेवणारा असा होता तरी चटकन मेणा तयार करवून अवलियाचे भेटीस गेला त्यानें कित्येक भेटींत त्यास पराकाष्ठेचें शिटकारून पाण्याहून पातळ केलें. व पुढें पश्चात्तापानें त्याचें मन उपदेशास पात्र झालेलें पाहून बुद्धिवाद सांगितला. बायकोच्या वाईटपणाचें जें त्याच्या मनांत वेड होतें तें समूळ काढून टाकिलें. माधवाविषयीं खोटें तर्कशास्त्र त्याचे मनांत भरलें होतें तें सर्व त्यानें लटपटवून दिलें. बायकोविषयींची प्रीति व उत्सुकता त्याच्या मनांत बिंबवून दिली. व मागील दाखला पटवून श्रीधरपंताची बायको व महादेव हीं सख्खीं बहिण भावंडें होतीं तें त्याला कळविलें. आणि आज्ञा केली कीं आपले बायकोचे घरीं जाऊन केल्या अपराधा बद्दल तिला क्षमा मागून आपले घरीं घेऊन ये. त्याप्रमाणें कबूल करून तो पाहाटेचे रात्रीं तेथून निघाला-

श्रीधर पंताच्या बायकोचें नाव सगुणाबाई ती माहेरीं अत्यंत आजारी पडली होती तेव्हा कोणी चतुर वृद्ध वैदिण रात्रीं येऊन तिला कांहीं औषध देत असे व दोनदोन घटका तिच्यापाशीं बसून तिला तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी सांगत असे तिला हें दुखणें कसलें आहे व कशानें बरें होईल हें सांगून गावांतील गोष्टी व त्यांत श्रीधर पंताची आणि अवलियाची गाठ व त्याच्या प्रकृतीस उतार पडत चालल्याची गोष्ट सांगत असे. नंतर त्यादोघींचा संकेत होऊन त्याच रात्रीस पाहाटेस सगुणाबाई आपले घरून बाहेर निघाली. व आपले समोरून कोणी स्त्री येत आहे हें पाहून श्रीधरपंत अवलियाचे आज्ञेप्रमाणें पाठमोरे होऊन उभा राहिला तेव्हां वृद्ध स्त्रीनें सगुणाबाईस सांगितलें कीं हेतु पूर्ण झाला. आतां पुढें होऊन घट्ट पाय धर. त्याप्रमाणें तिनें पतीच्या चरणीं मस्तक ठेवून लोळण घेतलें व तोही ती आपली बायको आहे हें ओळखून सद्गदित झाला. व दोघेही दृढ प्रेमालिंगन करित होत्सातीं रस्त्यावर निचेष्ट पडलीं- व पुढें त्यांच्या मनुष्यांनीं त्यांस घरीं आणिलें. व अवलिया आणि शिष्य गुप्त झाले.

नंतर कांहीं काळानें ते पुन्हा उदय पावले व श्रीधरपंतानीं त्यास आपले घरीं नेलें व पुढें असें समजलें कीं श्रीधरपंताचे तीर्थरूप नारायण शास्त्री हेच अवलिया झाले होते व तेच वृद्ध वैदिणही झाले होते आणि महादेव हाच अवलियाचा शिष्य झाला होता; येणें करून सर्वांस परमाश्चर्य वाटलें. या प्रमाणें या पुस्तकाचा सारांश आहे. व हा प्लट म्हणजे संविधानक मोठें मनोरंजक आहे.

आतां या गोष्टिवर आम्हीं आपला अभिप्राय पुढील अंकांत लिहू.

## कृषिकर्मांचा उदय होण्याची उमेद.

आपल्या हिंदुस्थानची जमीन फार पिकाऊ आहे. आपले शेतकरी लोकांस यांत्रिक किंवा कलाकौशल्याचें सहाय फारच कमी, व ते मेहनतही फार कमी करितात. असें असतां सर्व देशाचा गुजारा आपले एथीलच धान्यावर होत आहे यावरून हिंदुस्थानच्या जमिनी किती मोठ्या फलद्रूप व मातबर आहेत याचें सहज अनुमान होईल. कित्येक प्रांतांत जमिनी अशा उत्तम आहेत कीं एक साल नांगरल्या म्हणजे दहा वर्षें नांगरावयास नकोत. व दोन चार पाऊस पडले कीं, साऱ्या वर्षाच्या धान्याचा उलगडा झाला. अशा जमिनीच्या उत्तम गुणांवरून कित्येक प्रसंगीं जमिनीच्या तुकड्यास "सोन्याचें ताट" असें देखिल अलंकाररीत्या म्हणण्यांत येतें, अशा हिंदुस्थानच्या जमिनी असतां हिंदु लोकांस प्रस्तुत इतकें दारिद्र कां यावें अशी साहजिक कल्पना मनांत येते. आणि तीविषयीं चांगला विचार केला असतां असें दिसतें कीं, देशांतील प्रजेच्या जितक्या भागाचें शेतकी कामावर लक्ष लागलें पाहिजे आहे तितक्याचें लागलें नाहीं. प्रस्तुत अशी समजूत आहे कीं, ज्यास रटफ कांहीं करितां येत नाहीं त्यानें म्हणजे जनावरतुल्य मनुष्यानें शेतीचें हलकें काम करावें, त्या कामांत बुद्धीचा किंवा अधिक द्रव्याचा उपयोग कोणी करित नाहीं. शेकडो वर्षें जो एक प्रकारचा नांगर, एक प्रकारचें कुळव, एक प्रकारची मोट, व एक प्रकारचीं इतर आउतें आहेत तींच चालू आहेत, त्यांत काडीमात्र कंपेश नाहीं. व लोकांनीं आपल्या बुद्धीनें त्यांत सुधारणा करावयाची किंवा नवीं यंत्रें तयार करावयाचीं तें राहो; पण इंग्लिशांच्या राज्यसत्तेच्या संबंधानें त्यानीं होऊन विलायती नांगर, पाणी काढण्याचीं यंत्रें, धान्यें मळण्याचीं यंत्रें वगैरे या देशीं आणवून लोकांस सुंदर नमुना दाखविला आहे तरी लोकांची अजून त्यांकडे प्रवृत्ती होत नाहीं हें पाहून वाईट वाटतें. जो मनुष्य शाळेंत तयार होतो तो चाकरी शोधावयास लागतो व ज्यास खाण्यापिण्यास वडिलार्जित अन्य साधन नाहीं तो चाकरी मिळविण्याच्या उद्देशें शाळेंत जातो. असा लोकांचा कल एक तऱ्हेवाईक झालेला आहे. शेतकऱ्याच्या मुलास सामान्य तरी विद्या पाहिजे व जमिनदार यांच्या बापांची वतनवृत्ती किंवा गाठीस च्यार पैसे आहेत त्यांस ही विद्या करण्याची आवश्यकताच नाहीं असा साधारणपणें देशाचा समज होऊन गेला आहे. आणि तो पालटल्या खेरीज देशास चांगली स्थिती सहसा यावयाची नाहीं असें बहुत सुज्ञ व दूरदर्शी लोकांचें मत आहे.

मागील काळीं कृषिकर्माचें मोल कमी मानलें गेलें होतें असें नाहीं कारण जुनी म्हण आढळते कीं "उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ चाकरी." ही म्हण फार प्राचीन आहे. व बहुत लोकांच्या तोंडीं आणि कानीं आहे. पण हल्लींच्या काळीं हिचा स्वतां अनुभव घेणारे जाणत्या लोकांमध्यें फार थोडे आहेत. आम्हांस वाटतें कीं ही म्हण ज्या काळीं उत्पन्न झाली त्याकाळीं इतर सर्व धंदेकऱ्यापेक्षां शेतकरी लोक सुखी असावेत. कारण कोणत्याही गोष्टीची म्हण पडण्यास तिचा त्या कालचा चांगला अनुभव पाहिजे. व त्या त्या काळीं त्या त्या प्रमाणें अनुभव असावा असें शेकडो म्हणी पाहिल्या असतां लक्षांत येतें. आणखी ही एवढी अनुभाविक जर उत्तम शेतकीची म्हण होती तर ती लोकांच्या प्रवृत्तींतून इतकी एकदम कशी निघून गेली असावी याविषयीं ही शंका उत्पन्न होते. व ती विषयीं विच्यार केला असतां असें दिसतें कीं शेतकरी लोक सुखी असल्याच्या पुढें मोंगलाई झाली तेव्हां जो पाहावा तो शिपाई बहादर, आणि बळी तो कान पिळी असें झाल्यानें जितके जबरदस्त होते तितक्यांनीं गरीब शेतकरी व व्यापारी इत्यादि शस्त्रहीन लोकांवर नानाप्रकार

चे जुलूम केले, त्यांस बिगारीस धरिलें, व त्यांपासून द्रव्यदंड घेतले. अशी वहिवाट बराच काळ पडत गेल्यानें शेतकी आणि व्यापार हे दोन्ही धंदे अगदी भिकार व अयोग्य ठरले, आणि चाकरमाने पुढें सरसावले. मग त्या लुटारू शिपायांच्या राज्यांत " काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर." ही म्हण पडली असावी. व तेव्हांपासूनच हा चाकरीचा धंदा मोठ्या प्रतिष्ठेचा व अब्रूचा झाला असावा. कारण चाकरावर कसल्याही प्रकारची जबाबदारी, ओझें, अगर भय नसून मनास येईल त्याप्रमाणें वर्तन करावयास सापडे. व नेमणूक थोडी असली तरी पोट मिळकती पुष्कळ असत; परंतु आतां तो रंग बदलत चालला आहे. शाळा बहुत झाल्याच्या योगानें चाकऱ्यांकरितां उमेदवार शेकडोच्या शेकडो तयार होऊन पडले व नवेही वर्षानुवर्ष होतच आहेत तेव्हांही संख्या सरकारच्या गरजेपेक्षां फाजिल झाली म्हणून निरुपायानें तिकडील वळण मुरडण्याचा योग आला आहे. दुसरी गोष्ट, आतांचें राज्य इंग्रजी यांत पोटमिळकतीचीं चोरदारें कमी व त्या कृत्यांची छीथू फार. यामुळेंही चाकरींत हाशिल राहिलें नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं देशांत इंग्रज सरकारचें राज्य झाल्यामुळें जबरदस्ती व लुटारूपणा नाहींसा झाला, स्वस्थता व संरक्षण वाढलें, व साधारण बरीच महागाई हांत चालली इत्यादि कारणांमुळें शेतकीस उत्तेजन येणें आतां जरूरच आहे. व त्याप्रमाणें लवकर आलें असतां देशाचें लवकर हित होईल.

इंग्रज सरकारानें इरिगेशन म्हणजे धरणें व पाट बांधण्याचें नवीनच खातें उत्पन्न केलें आहे व लक्षावधि रुपये खर्च करून मोठमोठ्या नद्या व ओढे यांचे पाट बांधून काढून प्रांतोप्रांत बागाईत करण्याची सक्त मेहेनत चालविली आहे व तेणेंकरून आमचे देशच्या शेतकीला तेजी येईल यांत संशय नाहीं.

याखेरीज दुसरी एक आनंदाची गोष्ट घडत आहे ती आमचे वाचकांस कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो. ती गोष्ट येणेंप्रमाणें—हिंदुस्थानांत कला कौशल्य वाढविण्याच्या खटपटीकरितां विलायतेस एक मंडळी आहे. तिनें महाराणी साहेबांजवळील हिंदुस्थानचे स्टेट सेक्रटरी यांजकडे कित्येक थोर थोर साहेबलोक पाठवून एक अर्ज गुदराविला आहे. त्यांत नजकूर कीं फ्रान्स वगैरे देशांत सरकारचे दिवाणी, फौजदारी, वसुली खात्याप्रमाणें शेतकीचें म्हणजे जमिनीचें उपज वाढविण्याचें खातें आहे. तसें हिंदुस्थानांत इंग्रज सरकारानें अगत्य खातें ठेवावें. व उत्तम उपज करणारांस पैशाची तगाई द्यावी. व जे कोणी चांगली लागवड करण्यास पुढें सरसावतील त्यांस त्याविषयीं सविस्तर माहिती द्यावी. देशांत पंडित जमिनी कोठें किती आहेत. त्या मालकीनें अगर सारा देऊन कोणत्या प्रकारें लोकांस मिळतील, शेतकीच्या वेगवेगळ्या तऱ्हा काय आहेत, व त्यांतून कोणत्या ठिकाणीं कोणत्या लागू पडतील. तसेंच कोठें काय पेरितात, त्याचें पीक कसें होतें, व मागें सालोसाल कसें होत गेलें याचीं पत्रकें प्रसिद्ध करावीं. तसेंच खत कोणतें ठिकाणीं कोणत्या जातीचें घालावें व तें कशा प्रकारें घालावें याची माहिती द्यावी. व चहा, काफी, कापुस, रेशिम, लोकर वगैरेची उत्पत्ती हिंदुस्थानांत उत्तम तऱ्हेची व विपुल व्हावी या गोष्टीकडे हिंदुस्थान सरकार विशेष लक्ष देईल अशी तजवीज आपण कृपाळुपणें केली पाहिजे.

स्टेटसेक्रटरी ड्युक आफ अर्गाइल यानीं म्हटलें कीं तुमचा अर्ज फार आवश्यक व आमच्या इच्छेस अनुरूप असा आहे. याकरितां हिंदुस्थानचे गवरनर जनरल लार्ड मेयो यांस याविषयीं आम्हीं अगत्य लिहूं

ही गोष्ट हिंदुस्थानास मोठ्या भाग्याची समजली पाहिजे व ती विलायतेंतील उदार मनाच्या लोकांनीं सुचविली याकरितां त्यांचे आभार मानिले पाहिजेत.

---

## BEGGARY DECREASING THE NATIONAL WEALTH

*To,*

*The Editor of the " Varad Samachar*
*Akola.*

*Sir,*

There are very many things which tend to reduce the greatness of a country in point of wealth, among which the malpractice of begging is held out to be one of the same. All things in this world whether visible or invisible are of course created by the Almighty and it seems the man, the only rational being on the surface of the earth, has been given predominance over them all. But what does the man do? He cares for none but his own self. In fact he strives day and night to fill up his own coffers at the expense of others, not caring a bit for the injuries which others are likely to suffer on account of his so doing. But really speaking, the law of nature does not seem to command anything of the kind. It tells us to earn for ourselves at the sweat of our own brows and never to depend on others nor merely upon chance. But we Hindoos prejudiced from times immemorable, believe that giving *dharma* or something in charity to any and particularly to a Brahmin, may he be any how, is excellent in itself, and secures a happy position for us after our death in the heaven. In fact, those who do these things, do not know the principles on which the laws of charity are based. This is something like adding insult to injury. There are such lazy fools on the earth that when they are fed by the benevolent class, they never try to make their own way with a fair bargain, but on the contrary they idly while away their time amongst their fellow-vagabonds. Sometimes they go about villages and deceive poor women by falsely representing the orthodox opinions which are in fact no realties at all. The *joshees* for instance, always use such fashioned tricks that before they go to a certain gentleman's house, they obtain a general information of him beforehand, then enters his house and at once tell him the stories connected with his past and future conditions. In case if they are cross questioned, they generally answer in such a way as to produce a double meaning, so that either one or the other is the probable truth. He is thus rewarded richly for nothing but falsehood not known to be so by the rewarder. His example is followed by another and so on. The same is the case with all the other classes of beggars; finally matters come to such a pass that they consider their different professions to be heriditory ones, and that they are always pleased to continue it for ever. If then the number of these men increase and that of their supporters decrease, what will be the state of the country our supposition knows no bounds.

*(to be continued)*

---

## Local

## वऱ्हाड.

बुलढाण्याच्या इंग्लिश आफिसा पैकीं रा० बापुजी भिकाजी डिपुटी अकौंटंट यांस नाशिकाकडे जागा मिळण्याचें धोरण आहे असें नगरच्या पत्रावरून कळतें.

खामगांवचे शाळेंत महाराचा मुलगा शिकावयास घेतला त्यामुळें लोकांत फार गवगवा झाला आहे व सुमारें ८० मुलें शाळा सोडून गेलीं. आम्हीं पुढील अंकांत या विषयीं कांहीं सूचना लिहूं.

शाळांतील फीचे दर सप्तंबर महिन्यापासून कमी करणार आहेत. पहिलें मराठी बूक शिकणारांस एक आणा, व बाकीच्या मराठी शिकणारांस दोन आणे, व संस्कृत व इंग्लिश शिकल्यास च्यार आणे; हायस्कुलांतील पहिले च्यार वर्गांस आठ आणे व खालचे वर्गांस सहा आणे; हे फीचे दर आहेत. परंतु ज्या मुलांचे वडील विद्यापट्टी (इजुकेशनलेसस) चा कर देतात त्यांनीं सदरील प्रमाणांच्या निमें फी देत जावी असा ठराव केला आहे. मुलींच्या शाळांस फी नाहीं.

मराठी सहा व हिंदुस्थानी च्यार अशा दहा स्कालरशिप्स हायस्कुलांतून देणार आहेत.

पुढील वर्षापासून हायस्कुलांतील एक्झिबिशनर ४० चे ३५ करणार.

इलिचपुर—येथें एक मोठा डाका पडणार अशी खबर तेथील पोलिस सुपरइंटेंडेंट यांस पूर्वींच लागून त्यांनीं पाळतीवर राहून चोरट्यांस ऐनप्रसंगांत पकडलें असें कळतें—मि. स्प्यान्स्की साहेब डिपुटी कमिशनर १९ वे तारखेस तीन महिन्यांचे रजेवर मुंबई पुण्याकडे जाणार. व १२ वे तारखेस मि. मेंजी साहेब त्यांचे बदली येथें येणार होतें. सु० प्र०

फारेस्ट म्हणजे जंगल खातें वऱ्हाडचे व मध्यप्रांतचें मिळून एकच होतें तें वेगवेगळें केलें. व वऱ्हाडास मि. जी. डब्ल्यु. स्ट्रेटेल यांस नेमिलें.

मध्यप्रांत म्हणजे नागपुर व त्याखालील १९ जिल्हे यांत कमिशनरी अमल आहे तो लवकरच मोडणार. व ते १९ जिल्हे आणि त्यांच्या हद्दीवरील वायव्य प्रांतांतील कांहीं जिल्हे मिळून एक मुलुख करून तो येका नव्या लेफटिनेंट गवरनरच्या सत्तेंत देणार आहेत.

उमरावतीस पावसाचा जुवा खेळण्याची व्यापारी लोकांत येक नवी चाल निघाली आहे. म्हणजे पाउस पडेल येकानें म्हणावें व पडणार नाहीं दुसऱ्यानें म्हणावें आणि पैजा माराव्या. अशा कामीं हजारो रुपयांची बूड होत आहे असें सत्यप्रकाश कर्ता लिहितो —वसंतचा कपाशीचा भाव १२९चा आहे.

वाशिमाहून ११वे तारखेचें पत्र आल्यावरून तिकडे मेघ राजाची वृष्टी बरी आहे, हवा थंड असते, रोगराई बिलकूल नाही, व मि० फिटझरलड साहेब प्रांतांत फिरावयास गेलेले परत आले, असें कळतें.

अडगावचे वकील कृष्णराव गणेश यांची सनद रद्द करावी किंवा कांहीं काळ त्यांस सस्पिंड करावें अशी डिपुटी कामिशनर मि० मेकंजी साहेब इनच्यार्ज असतां शिफारस झाली आहे. व कारण केवळ सामान्य आहे.

### मलकापुराहून.

आपला माझा जरी परिचय नाहीं तरी मी आपल्या प्रसिद्ध नावावरून ओळखितों व याजवरून आपणांस परोपकारें चार ओळी लिहितों त्यांस आपल्या सुंदर पत्रीं स्थळ द्याल अशी इच्छा करीत आहे. माझ्या प्रार्थनेची पूर्णता करणें आपणाकडे आहे.

या गांवीं महामारी बाईसाहेबाच्या स्वारीचा तळ आज बरेच दिवस आहे. त्यांच्या पराक्रमाचें वर्णन फार काय सांगावें. आज १९ दिवसांत त्यांनीं आपला आहार पूर्वींपेक्षां चतुर्गुणित किंबहुना अष्टगुणित करून या मलकापुरवासी जनांवर पूर्ण अंमल बसाविला आहे. दररोज १०–१९ जिवांचा बळी जात आहे तेणें करून लोक फार भयाभीत होऊन परग्रामीं जाताहेत.

पत्रकर्ते महाराज काय सांगावें, बाईसाहेबानीं आपल्या अमलाचा इतका बंदोबस्त केला आहे कीं तो लिहिण्यास फार दु:ख वाटतें. हरहर! काय करावें येथील शाळेस तर साडेसाती शनीच आला आहे. दहा वाजतां घरीं गेलेला मुलगा पुन: २ वाजतां शाळेस येण्याचा अंदेशाच. बहुत करून मुलांवरच सपाटा फार बसला आहे. कांहींच इलाज नाहीं. परजन्य तर आज १९ दिवस झाले रस्ते ओले होण्यासारखा आला होता, त्यावर स्वप्नींही नाहीं म्हटलें तरीं चालेल. सर्वत्रांचे नेत्र बाईसाहेबाच्या गमनाकडे व परर्जन्याच्या आगमनाकडे चातका प्रमाणें आहेत.

ता० ११ चें एका मित्राचें पत्र अल्यावरून कळतें कीं ८वे तारखेपासून च्यार दिवस येथें पर्जन्य उत्तम पडला. महामारीची स्वारी अद्याप आहेच. पण डेरे राहुटीच्या खुंट्या उपटून जाण्याची तयारी दिसत आहे. काल रोजीं तिच्या बोळवणी करितां गावाबाहेर पूजा झाली.

मोठ्या उत्सुकतेनें व आनंदानें आपल्याकडे हा खालील थोडासा मजकुर लिहून पाठवितों त्यास आपल्या येत्या सुंदर अंकांतील एका कोपऱ्यास जागा द्याल अशी आशा आहे. कारण आपण खऱ्या

सुधारणुकेचें आदिस्थान आहात असें जाणून लिहितों.

या वऱ्हाड प्रांतस्थ लोकांची बुद्धि कांहीं अंशीं सुधारणुकीचे कामांत मोठ्या झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत आहे, हें आमच्या मलकापुरस्थ लोकांच्या कृत्यावरून लक्षांत येईल.

येथें मागील आक्टोबर महिन्यांत लायब्ररी स्थापण्याच्या उद्देशानें, मेहेरबान ताजूदिन साहेब व रामसेवक साहेब एकस्त्रा असि० क० यांनीं एक सभा भरविली होती. त्या सभेत विचार होऊन आजपर्यंत सुमारें ९०० रुपये वर्गणी जमा झाली. सरकारांतून २०० रुपये देण्याचें ठरलें आहे. त्या प्रमाणें ता० ८ आगस्ट सन १८६९ रोजीं लायब्ररींत बडी सभा झाली. सर्व सभासद मिळाल्यावर रा० गणेश रावजी वकील यांणीं सभेचा उद्देश व लायब्ररीपासून फायदे या विषयावर निबंध वाचून मूल उत्पत्तिकर्ते यांचे आभार मानिले व याच विषयावर रा० भास्कर लक्ष्मण अ० मा० यांणीं सुरस असें भाषण केलें. सरकारी कामगार, वकील, शाळेकडील मास्तर, शेट सावकार व इतर सभ्य गृहस्थ यांचा बराच समाज जमला होता. सभेत मंडळीच्या प्रार्थनेवरून मे० मौलवी ताजुदिन साहेब यांणीं अध्यक्ष स्थान स्वीकारलें होतें. नंतर म्यानेजिंग कमिटींतील मेंबराच्या व सेक्रटरीच्या नेमणुका झाल्या त्या याप्रमाणें.

अध्यक्ष.

मे० मौलवी ताजुदिन सा० अ० कमि०
रा० रा० मल्हार सदाशिव तहाशिलदार.

मेंबर.

रा० यशवंत सुबाजी ना० तहशिलदार.
रा० रंगो जनार्दन शिरस्तेदार नि.अ. कमि.
रा० गोविंद हरि वकील.
मि० न्याहारखा साहेब.
रा० गणेश रावजी वकील.
रा० त्रिंबक मरीळ वकील.
रा० तुकाराम निळकंठ वकील.
मे० हिंदुस्थानी शाळेचे हेडमास्तर.

सेक्रेटरी.

रा० रा० विश्वनाथ रघुनाथ हेड मास्तर
रा० भास्कर लक्ष्मण फ० अ० मास्तर

सदरहूप्रमाणें सर्वानुमतें नेमणुका झाल्या. लायब्ररीकरितां २९० रुपयांचीं बुकें इंग्लि० मरा० फार० वगैरे व वर्तमानपत्रें टाइम्स आफ् इंडिया, इंदुप्रकाश, हिंदुपंच व ईस्ट इंडिया असोसियेशन मासिक पुस्तक. आणि सामान खुर्च्या मेजें, आलमेरी, हंडपा, वगैरे मुंबईहून आणविलें आहे.

खालीं लिहिलेलीं वर्तमानपत्रें कित्येक गृहस्थांनीं बक्षिस दिलीं त्यांचीं नावें.

मे. ताजूदिन सा.—औदअखबार.
तहशिलदार—वऱ्हाडसमाचार.
रावजी राघव—अरुणोदय.
गोविंद हरी.—सत्यप्रकाश-
त्रिंबक मैराळर. खानदेश वैभव.
न्याहा खा साहेब लाहोरचे फारसी पत्र.

लायब्ररी करितां मासिक वर्गणी २९ रुपये व ९ रुपये सरकारी मिळून ३० रुपये आकाराची याद झाली आहे; जागा जुन्या तहाशिलदार कचेरींत मुकार झाली इतकें झाल्यावर पानसुपारी होऊन सभा विसर्जन झाली. लायब्ररी स्थापितसमयीं मेघराजास सुद्धां आनंद होऊन त्या समया पासून या घटकेपर्यंत सुवृष्टी होत आहे.

---

## अकोला.

एथें सरकारी तारायंत्र हपीस पुन्हा सुरू झालें आहे.

एथील तुरुंगांतून या आठवड्यांत ४ कैदी पळाले होते ते काल पकडले.

एथील पोस्ट मास्तर मि० तालुबुदीन याजवर कोणी निनावी अर्ज केला आहे व तें प्रकरण चौकशीस आलें आहे. त्यांतील हकिकत आम्हीं पुढील अंकांत लिहूं.

गेल्या बुधवारीं दिवसां व रात्रीं पर्जन्य फार मोठा व उत्तम पडला. येणेंकरून सर्व लोक आनंदी आहेत. पर्जन्यकाळ सुरू झाल्यापासून असा चांगला पर्जन्य पडला नव्हता.

शाळा खात्याची कांपिटिटिव परीक्षा तारीख २७ आक्टोबर रोजीं सुरू होणार. अकोल्यास किंवा उमरावतीस होणार हें मागाहून कळेल.

मे० लायल साहेब कमिशनर यांजकडून खालील दोन सरकारी लेख आम्हाकडे प्रसिद्ध होण्याकरितां आले आहेत तें एथें घेतों.

## जाहिरात.

सारा ठरविलेले जमिनीचे पृष्टभागाचा कबजा जावत्‌काळपर्यंत सारा दिला जाईल तावत्‌काळपर्यंत पैमाषीवरून मिळतो. परंतु जमिनीचे अंगीं उत्पन्नशक्ती आहे तिची नासाडी करण्याचा अधिकार वहिवाटदारास नाहीं आणि पृष्टभागा खालीं असणारे सर्व मौल्यवान पदार्थांवर सरकारचा अव्वल हक्क आहे. हैद्राबाद अमानी मुलकांतील व्यापक किंवा खुल्या जमिनीमध्यें खाणी खणण्याची किंवा दगड काढण्याची कोणा मनुष्याची इच्छा असेल अथवा शेतकीचे सुधारणुकीचे कारणाशिवाय दुसरे कोणतेही कारणाकरितां जमिनीची चिरकाळ राहणारी अव्यवस्था अथवा बदसुर्तीं कोणी करूं इच्छील तर तसें करण्याविषयीं परवानगी मिळण्याकरितां त्याणें मुलकी अधिकाऱ्याकडे अर्ज करावा. आणि जमिनीचा सारा ठरविण्याविषयीं अथवा मौल्यवान खनिज पदार्थ सांपडल्यापासून होणारे ज्यास्त फायद्याचा योग्य हिस्सा सरकारास मिळण्याविषयीं जे अवश्य उपाय दिसतील ते ते मुलकी अधिकारी योजतील.

A. C. LYALL
Commissioner West Berar

## सरक्युलर

नंबर २९६६.

मेहेरबान रेसिडेंट साहेब हैदराबाद यांस

सिमला—ता० १६ जुलई १८६९ इ०

जाहिरात नंबर ९५९ तारीख ३१ मे सन १८६९ ची इंडिया ग्याझेटचे पार्ट १ चे १२ वे पानांत छापून प्रसिद्ध केली तिजवरून सरकारी खुर्दा घेणारे लोकांस जो बट्टा मिळत असे तो बंद झाला आहे.

२. इंडिया सरकारचे आज्ञेवरून आपणास विनंती करितों कीं, आपल्या हाता खालचे जिल्ह्याचे अधिकारी यांस कळवावें कीं, तहशील वगैरे सर्व खजिन्यांत खुर्दा लोकांची गरज भागेल इतका ठेवावा. आणि लोकांस सर्व देशभर असें जाहिर करावें कीं, या सर्व खजिन्यांतून कांहीं बट्टा वगैरे न पडतां खुर्दा मिळेल.

३. वारंवार अशीं गाऱ्हाणीं ऐकण्यांत आलीं आहेत कीं, खुर्दा मागणारे लोकांचे मार्गांत खजिनदार आणि असे कामगार हरकती आणितात. यास्तव अशा प्रकारची गैरचाल बंद होण्याविषयीं होईल तितकी पूर्णसावधगिरी आपण योजावी.

(सही) जी. एच. एम. ब्याटल
अडंर सेक्रेटरी टु दि गव्हरमेंट,
आफ् इंडिया.

---

## Epitome of News.
## वर्तमानसार.

भोरचे पंत सचीव यांचा मार्च महिन्यांत वाडा जळून कित्येक लक्ष रुपयांचें नुकसान झालें. त्यांनीं नव्या वाड्याचें काम सुरू केलें आहे. व इंग्रज सरकारास कर्जाऊ रकम मागितली. त्यावरून हिंदुस्थान सरकारानें त्यांस दरसाल दर शेकडा ५ रुपये व्याजाचे दरानें येक लक्ष रुपये कर्ज देण्याचा ठराव केला. व दरसाल २०००० रुपये प्रमाणें पांच वर्षांत याची फेड व्हावी असेंही ठरविलें आहे.

काबुलचे शेर अल्लीखान यांस गोळी लागून ते जखमी झाले आहेत. व सरदार इस्माइलखान हे बचावून स्वातकडे निघून गेले अशी खबर आहे.

मादुरा येथील कलेक्टर यांनीं असें जाहिर केलें आहे कीं गुरास दुसरे कसले खाण्याचे पदार्थांतून मिसळुन दर रोज अर्धा औंस मीठ चारावें म्हणजे तीं निरोगी व हुशार होतात.

छोटा नागपुराकडे लुटारू लोकांची येक टोळी कित्येक वर्षें त्रास देत होती तींतील २७ असामी पकडले आहेत यांत सन १८५७ सालचे बंडांतीलही कांहीं अपराधी आहेत असें म्हणतात.

मुंबईत कुलाब्यांत मनसुकदास कानदास नावाचे व्यापाऱ्याचा गेले सोमवारीं ५०००० रुपयांचा कापुस व १५००० रुपये किमतीचें घर आग लागून जळालें.

आस्ट्रिया देशामध्यें लिन येथें लार्ड बीशप यांनीं भजनांमध्यें सरकारानें ज्या कांहीं लग्न संबंधीं, विद्या संबंधी व इतर सुधारणा केल्या आहेत त्याविरुद्ध भाषण केलें म्हणून त्यांस अपराधी ठरवून तीन महिने कैदेची शिक्षा दिली.

सिंध प्रांतांतील पत्रांत लिहिलें आहे कीं सापाचे विषावर लिकर अमोनिया हें औषध वस्ताद आहे याजकरितां ठिकठिकाणीं पोलिस स्टेशनांत हें औषध कमिसरी खात्याकडून ठेवावें व जे लोक तें मागावयास येतील त्यांस फुकट द्यावें.

मुंबईस विक्टोरिया नामक बगीच्यामध्यें मांडण्याकरितां बडोद्याचे गायकवाड सरकारानीं विलायतेहून महाराणी विक्टोरिया साहेब यांची संगमरवरी दगडाची येक मूर्ती करविली ती इकडे येण्या करितां तयार झाली आहे लवकरच येईल. महाराणी साहेब राजकीय पोशाग करून सिंव्हासनावर बसल्या आहेत अशी ती मूर्ती आहे तिची उंची ८ फूट आहे. या मूर्तीची बनावट फारच उत्कृष्ठ साधलेली आहे असें तिकडील पत्रांत लिहिलें आहे. हिला खर्च सुमारें २ लक्ष रुपये लागला आहे.

राणी साहेबांचे चिरंजीव येऊन जो मोठा दरबार भरावयाचा तो आग्रा येथें न भरतां लखनौस भरणार असें वर्तमान आहे.

ब्रम्हदेशचे राजानें गवरनर जनरल साहेबांस सन १८६६ सालीं एक पत्र लिहिलें होतें त्यांत त्यानें आपली मरातब लिहिली होती ती—राजाधिराज वैभव शाली तामाप्रांत व तामपीपचे राजे, पूर्व भागच्या सर्व छत्रपति संस्थानिकांचे अधिप, तेजःपुंज सूर्याचे सत्ताधारी, स्वर्गस्थ ऐरावताचे स्वामी, धर्मैक शुभदंताचे पालक, आणि उदार जनांचे मुख्य नायक यांजकडून हिंदुस्तान व पूर्वेकडील अन्य देशचे राज्याधिकारी यांस——याप्रमाणें लिहून नंतर अवांतर मजकूर लिहिला होता.

बडोद्याचे राजानीं कसरतीचे खेळ करणारे आले होते त्यांस ६०००० रुपये दिले——हल्लीं युरोपियन लोकांस एक टोलेजंग मेजवानी देण्याच्या तयारींत गायकवाड सरकार आहेत. शेकडो कोसांवरून साहेब लोकांस स्पेशियल गाडया आपले खर्चानें काढून त्यांतून बोलाविणार आहेत. तिला सहजीं कित्येक लक्ष रुपये तरी या कृत्याकडेस उडतील असें दिसतें.

मुंबई सरकारानें विलायतेहून नार्टन साहेबानीं तयार केलेले विहिरींतून पाणी काढण्याचे बंब मागाविले आहेत.

काटेवाडाकडे ब्राम्हण जातींत ३ वर्षांची एक मुलगी नुकतीच लग्न होऊन विधवा झाली आहे.

मुंबईच्या वैद्यक शाळेंतील मराठी वर्ग तयार होण्याचे कामीं बडोद्याचे गायकवाड सरकारानीं २००० रुपये दिले.

मुंबईतील लोक प्रसिद्ध रितीची स्नानाची व पोहण्याची जागा करण्याचे तजविजींत आहेत. त्या कामास सरकारानें जमीन देण्याचें कबूल केलें आहे. व जागा बांधण्याचे कामीं ७०००० रुपयांचा अजमास झाला आहे.

---

नोटिस—गिता बिदुरीण राहणार उमरावती ईस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सखी सासू असून माझी बायको आज तीनवर्षें तूं आपल्या घरीं नेऊन तिजला मीं आणण्याकरितां उमरावतीस दोन चार वेळां आलों. पण माझे बायकोस तूं माझे घरीं पाठवित नाहींस याचें कारण काय हें मनला कांहींच समजत नाहीं सबब या नोटिशीनें कळवितों कीं, तूं माझी बायको माझे घरीं आठ दिवसात आणून घालावी ह्याप्रमाणें न केल्यास लग्नास खर्च लागला त्याची दामदुप्पटसुद्धां दिवाणी कोर्टांत फिर्याद करून घेतली जाईल हें तुजला कळावें तारीख १४ आगस्ट १८६९ इ०

(सही) विठोबा वल्लद गंगाराम मोहाळकर राहणार अडगांव तालुके अकोट जिल्हा अकोलें.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० आपण येते अंकांत पुढील च्यार ओळीस जागा द्याल अशी पूर्ण आशा धरून सादर करित आहे.

मुंबई इलाख्यांतील सर्व पोष्ट मास्तर यासहीचा राणीसरकारास गैबी अर्ज आहे त्यांतील मुख्य विषय सब इनस्पेक्टर पोष्टहापिसें तपासण्यास आले असतां सर्व खर्च मास्तर यास करावयास लावून कर्जाऊ रुपये घेऊन जातात,इनस्पेक्टिंग पोष्टमास्तर हलके कानाचे असल्यामुळें खर्च वगैरे न केला तर नाश होतो. व ते आमच्या बायका घेऊन जाऊन आम्हांस विरह समुद्रांत सोडून देतात, हा आहे.

सब इनस्पेक्टर जर मास्तर यांजकडून सरंजाम घेऊन त्यांस त्याबद्दल किम्मत देत नसते तर आजपर्यंत गवगवा होऊन मोजणीदार, शिरस्तेदार वगैरे लोकांस कांहींएक देऊ नये म्हणोन सरक्युलरें आहेत त्याप्रमाणें जाहालीं नसतीं काय? इंग्रेज सरकारचें राज्य न्यायी असून पिनल कोड ही ज्यारी आहे. मग आजपर्यंत फिर्यादी कां जाहाल्या नाहींत?

इनस्पेक्टिंग पोष्टमास्तर सब इनस्पेक्टरावर भरवसा ठेवून निरपराधी डिपुटी पोष्टमास्तर यांचा नाश करण्यासारखे मूर्ख आहेत काय?

डेपुटी पोस्टमास्तर लोकांच्या बायका नेऊन त्यांस विरहित करितात हें समर्पक तरी दिसतें काय? एक तर केवळ हापिसचे कामाचा संबंध, दुसरें तर पूर्वीची ओळख मुळींच नाहीं, व तिसरें तर सब इनस्पेक्टर यांस तीन दिवसांहून जास्त राहाणें नाहीं इतक्या अडचणी असतां जर डिपुटी पोष्टमास्तर लोकांच्या बायका सब इनस्पेक्टर यांस भाळतात तर मग डिपुटी पोष्टमास्तर हीनबल असून त्यांच्या स्त्रिया व्यभिचारिणी समजल्या पाहिजेत. असो इतकीच विनंती आहे कीं या निनावी अर्ज करणारानें आपली सही केली असती तर सर्व इनस्पेक्टिंग पोष्टमास्तर लोक हलके कानाचे, व सब इनस्पेक्टर जार कर्मी, व डिपुटी पोष्टमास्तरणी जारिणी, व खुद्द डिपुटी पोष्टमास्तर बलहीन इतके दोष सर्वांस न लागते.व सब इनस्पेक्टर यांस शिक्षा होऊन डिपुटी पोष्टमास्तर त्यांचे हातून निसटून यशवंत जाहाला असता. याजकरितां अर्ज करणारानें आपली सही करून आपले नावाचा डंका करून सर्वत्रास सुख द्यावें. कळावें हे विनंती.

आपला एक क्ष

---

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० खालीं लिहिलेल्या चार ओळीस मेहेरबानी करून येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

कांहीं दिवसांमागें येथील बहिष्कृत प्रकर्णी हकीकत सेवेस सादर केलीच होती. आलीकडे नूतनच ते बहिष्कृत जाहलेले गृहस्थ पुनीत जाहले; त्याप्रीत्यर्थ त्यांस सुमारें पन्नास साठ रुपयांची नगदी चेरी मेरी जाहली असें कळतें. परंतु आम्हां गरीब ब्राम्हणांपासून शिवनेकर महाराजांनीं घरपरत्वें कोठें रुपाया कोठें दोनरुपये असा दंड घेतला खेरिज सदरील रुपयेही गारद जाहले असून आमचे रुपये आम्हांस परत मिळाले नाहींत.यावरून असें दिसून आलें कीं फक्त या गावांत तशा प्रसंगीं राहिल्या बद्दल च प्रायश्चिताप्रीत्यर्थ दंड जाहाला. अस्तु या प्रसंगीं वडयाचें तेल वांग्यावर निघालें यांत कांहीं मात्र शंका नको. अहो आम्हीं गरीब भिक्षुक ब्राम्हण. महाराजांची आज्ञा होतांच उजूर न करितां कोणी तांब्या मोड, गहाण ठेव, एक रुपाया परंतु तो दोन पैशांचे मितीनें काढ, अशा हर तजवीजी करून महाराजांची मर्जी अशा आशेवर संरक्षण केलीकीं याचा पुढें उलट उतारा होऊन महाराज आम्हां गरीबांची कींव करतील, परंतु सर्व व्यर्थ जाहलें. अशा योगानें संस्थानाच्या मोठेपणास थोडासा धक्का बसतो. हो, हो, हो, विसरलों शिवनेकर महाराजांकडून सर्व ब्राम्हण मंडळीस दोन रुपये नगदी कलदार मिळाले!!! काय सौख्याची गोष्ट पुसता!! एकूण बोआ आंवळा देऊन कोहोळा काढण्याची ही फार चांगली युक्ती आहे! मासला एथेंच घ्यावा. एडिटर राव स्वत: आबासाहेब व नानासाहेब हे उभयतां केवळ प्रति सूर्यच आहेत असें म्हटलें असतां अतिशयोक्ती होईल असें वाटत नाहीं; कारण कीं ज्याप्रमाणें त्यांचे अंगीं सौम्यता, नि:पक्षपातपणा, सम्मप्रीति,औदार्य वगैरे सद्गुण उत्तम प्रकारें वास करितात त्याप्रमाणेंच ते विद्वान असून उभयतांचा शास्त्रज्ञानांतही पराकाष्ठेचा प्रवेश आहे. हें खरें परंतु संस्थानाचा उत्तम झोंक चालण्याकरितां त्यांनीं आपल्या तोलाचेच एक दोन मनुष्य संग्रहीं ठेवावे. म्हणजे हल्लीं असलेल्या असमंजस सल्लेगारांवर त्यांचे प्रखर तेज पडून संस्थान याहूनही उत्तम दशेस पावेल. ही त्यांस आमची विनयपूर्वक शिफारस आहे. कळावें. ता० १२ जून.

गरीब भिक्षुक.

---

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते महाराज यांस विनंती विशेष आपल्या पत्रांत चार ओळी अल्पबुद्धीनें लिहिल्या आहेत या ओळीस जागा मिळेल अशी माझी आशा आहे.

कोणी कोणी सावकार लोक साल अखेर वहीवर सर्व कुळांचा अवल अढावा व अखेर अढावा काढित नाहींत—ज्या कुळांवर फिर्याद करणें असेल तेवढेंच खात्याचा उतारा करून तहशीलदार यांस याद देतात आणि त्या वही खात्यावर तहशीलदार सही करतात आणि खात्याप्रमाणें निवाडा करतात. सर्व वहीचा तपास करीत नाहींत त्यास खातेवहीवर व रोजकिर्द वहीवर अढावा असावा; कोणी कोणी सावकार लोक खातेवहीची व किर्द वहीचीं पानें काढून खोटा जमाखर्च करतात. कारण सावकार लोकांचे वहीवर एकुणात व शिक्के गांववार कुळकर्णी यांचे वहीप्रमाणें नसतात. तेणेंकरून ते लबाडी करून कुळास बुडवितात त्यास सदरीं लिहिल्याप्रमाणें सरकार जर लोकांचे वहीवर शिक्के करून देतील तर रयत ठकणार नाहीं. कोणी कोणी सावकार लेक कुळाचा वसूल आला असतां पावती देत नाहींत याजकरितां सावकार लोकांनीं कुळास पावती देण्याबद्दल तजवीज ठेवावी. एकूण तीन कलमीं मजकूर लिहिला आहे याप्रमाणें सरकार बंदोबस्त करील तर रयत ठकली जाणार नाहीं. सरकारानें रयत ठकूंनये म्हणून स्टांपकागद आणि राजिस्टर खातें केलें आहे तशी सदरील तीन कलमांबदल सरकार तजवीज करील तर रयतेस फार सुख होईल.

एक फिरस्ता

** सरकारचे कायद्यांचीं ओझीं रयतेवर पुष्कळच आहेत मग आणखी नवीन कशास इच्छावीं? ही गोष्ट लोकांची खासगी आहे. व कपट झाल्यास फौजदारी कायदे आहेतच आणि रयत जों जों शाहणी होऊं लागेल तों तों या गोष्टी कमी होतील. रयत ठकूंनये म्हणून स्टांपकागद झाले आहेत तर खोटीं खतें आतां होतच नाहींत काय?

व० स० क०

---

नोटिस— नारायण वलद चिंतामण सुतार वस्ती मौजे माटरगाव तालुके बाळापूर जिल्हा आकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतेकीं तुम्हीं तारीख ३ माहे जुलई सन १८६९ इसवी रोजीं वऱ्हाड समाचार छापखान्यांतून आमचे नांवची नोटिस दिली आहे त्या नोटिशीचें उत्तर तुमचा आमचे गावांत पाटीलकीचा कांहीं एक संबंध नाहीं व आम्हास अगर आमचे वडलास तुम्हीं अगर तुमचे वडलांनीं नेमलेंही नाहीं आमची फार दिवसी काळीवर पांढरी झाली त्या दिवसांपासून व डिलोपार्जित पाटीलकीचें वतन आमचे याहे व आमचे वडलानीं अगर आम्हीं तुम्हास अगर तुमचे वडलास कागदही लिहून दिला नाहीं असें असून विनाकारण तुम्ही आपले नोटिशींत सर्व खोटामजकूर लिहिला आहे व याबद्दल पूर्वी सरकारांत अपिला पर्यंत फिर्यादी होऊन तुम्ही खोटे जालें आहा त्यास विनाकारण असा खोटा मजकूर छापून दुसऱ्याचे ब्रूस कमीपणा अणाल तर इकडुन कायद्या प्रमाणें तजवीज होईल. या नोटिसीचा खर्च विनाकारण आम्हावर पाडला सबब पंधरा दिवसांचे आंत या नोटिसीचे खर्चाचे रुपये व आगगाडीचे खर्चासुद्धां तुम्ही आम्हास द्यावे लागतील न दिल्यास आम्ही कोर्टांत फिर्याद करून भरून घेऊ कळावे तारीख ९ माहे आगस्ट सन १८६९ इसवी.

(सही) जयराम वलद संभाजी पाटील मौजे सिरव तालुके मलकापूर याचे हातची खुद निशाणी रेघ.

---

नोटिस—उदाराम हेमराज मारवाडी सहू दुकान खांडवे जिल्हा मजकूर यांस खालीं सहीकरणार तोताराम. विठ्ठल डांगे दुकान मलकापुर जिल्हा बुलढाणें याजकडून देण्यात येतेकीं तुमेच मार्फत मोहो पल्ले २९ दर ८॥ प्रमाणें २१२॥- रुपयांचें जेष्ठ शुद्ध ३ रोजीं खरीदी करून त्यात पेशगी बदल खर्चही दिला बाकी रुपये आमचा मनुष्य चतरसिंग यासमागमे पाठविले असतां तुम्हीं मोहो न देतां सबब लिहिली कीं जाजपासून खरीदी घेतले तादेत नाहीं त्यास खरीद दाराशीं आम्हास कांहीं संबंध नाहीं करितां तुम्हास नोटिस देण्यांत येते कीं सदरी लिहिलेले मोहो पल्ले २९ आजपासून आठदिवसात आगगाडी मार्गाने मलकापुरास पाठवावे न पाठविल्यास शिरस्तेप्रमाणें फिर्याद करून येथील भावाचें नुकसान व पेशगीची रकम घेतली जाईल तारीख ९ सन १८६९.

(सही) तोताराम विठल डांगे दस्तुर खुद.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे आक्टोबर महिन्यांत आम्ही आकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरूकेलें त्यास दोन वर्षे होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

## TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास … … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| सहामाही अखेर … … | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत माळकांकरितां छापून प्र० केलें

उमरावतीस मुलांची कांपिटिटीव परीक्षा झाली त्या समारंभाविषयीं मागील अंकांत लिहिलें आहेच. आतां पगारी जागा कोणकोणास मिळाल्या तें लिहितों.

### मराठी स्कालरशिप्स (दरमहा १० रुपये)

| | |
|---|---|
| १ रामकृष्ण हरी. | उमरावती हाय स्कूल. |
| २ कृष्णाजी मल्हार. | अकोला हाय स्कूल. |
| ३ धोंडोबाळकृष्ण. | खामगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| ४ सखाराम विनायक. | बुलढाणा मराठी इंग्लिश स्कूल. |
| ५ विनायक गणेश | उमरावती हाय स्कूल. |
| ६ गोविंद लक्ष्मण | अकोला हाय स्कूल. |

### हिंदुस्थानी स्कालरशिप्स. (पगार १० रुपये)

| | |
|---|---|
| १ समशेर अली | उमरावती हिंदुस्थानी इंग्लिश स्कूल नंबर १ |
| २ महमद हानिफ | अकोला हाय स्कूल. |
| ३ महमद हुसेन | अकोला हाय स्कूल. |
| ४ महताबशा | कारंजा हिंदुस्थानी स्कूल. |

### पुरणमल संस्कृत स्कालरशिप (पगार ८ रुपये)

| | |
|---|---|
| १ सिताराम सदाशिव | उमरावती हाय स्कूल. |

### किसनीराम स्कालरशिप (पगार ८ रुपये)

| | |
|---|---|
| १ तुकाराम रामचंद्र | अकोला हाय स्कूल. |
| २ सखाराम आनंदराव | खामगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३ मुकुंद गणेश | उमरावती हाय स्कूल. |

या तिघांतून वरील क्रमानें जो पत्करील त्यास ही ८ रुपयांची स्कालरशिप उमरावतीस मिळेल.

### अबदुलवारी स्कालरशिप. (पगार ४ रुपये)

| | |
|---|---|
| १ शिवदयाळ बाळगोविंद | उमरावती हाय स्कूल. |

### एक्झिबिशनर.

ज्या मुलांचीं आईबापें किंवा पालनकर्ते अकोल्यास व उमरावतीस राहतात त्यांस त्यांचे नावाबर आलेल्या एक्झिबिशन्स न देतां बाकी निवड केली ती.

| | |
|---|---|
| १ अंबाजी भगवंत | अकोट इंग्लिश मराठी स्कूल |
| २ सदाशिव केशव | अकोला हाय स्कूल |
| ३ मुकुंद गणेश | उमरावती हाय स्कूल |
| ४ रघुनाथ बळवंत | उमरावती हाय स्कूल |
| ५ तुकाराम रामचंद्र | अकोला हाय स्कूल |
| ६ गोपाळ हरी | अकोला हाय स्कूल |
| ७ नारायण लक्ष्मण | अकोला हाय स्कूल |
| ८ व्यंकटेश कृष्ण | अकोट इंग्लिश मराठी स्कूल. |
| ९ त्रिंबक गणेश. | एलिचपुर क्यांटनमेंट इं०म० नं०१ स्कूल. |
| १० कृष्णाजी खुशालराव. | उमरावती हायस्कूल |
| ११ गोपिनाथ हरी. | देऊळगाव राजा इंग्लिश मराठी स्कूल. |
| १२ नारायण गोविंद. | उमरावती हायस्कूल. |
| १३ परशराम चिंतामण. | उमरावती हायस्कूल. |
| १४ दिनकर नारायण | खामगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| १५ अमृत गोविंद. | अकोला हायस्कूल. |
| १६ रंगो नरसिंव्ह. | एलिचपुर क्यांटनमेंट इं० म०स्कूल नंबर १ |
| १७ केशव वासुदेव. | मलकापुर इंग्लिश मराठीस्कूल. |
| १८ सखाराम आनंदराव. | खामगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| १९ मारुती हरी. | देऊळघाट इंग्लिश मराठी स्कूल. |
| २० अमृत त्रिंबक. | जळगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| २१ काशिनाथ यादव. | अकोला हायस्कूल. |
| २५ वासुदेव उमाकांत | मलकापुर इंग्लिश मराठी स्कूल |
| २३ श्रीनिवास निळकंठ. | वणी इंग्लिश मराठी स्कूल. |
| २४ नारायण रावजी. | मेहेकर इंग्लिश मराठी स्कूल. |
| २५ लक्षुमण कृष्ण. | वणी इंग्लिश मराठी स्कूल. |
| २६ नारायण सिध्धेश्वर | उमरावती हायस्कूल. |
| २७ लक्षुमण पंढरीनाथ | अकोला हायस्कूल. |
| २८ अमृत रामचंद्र | चांदुर मराठी इंग्लिश स्कूल. |
| २९ गणेश श्रीकृष्ण | अकोला हायस्कूल. |
| ३० विष्णु नारायण. | अकोला हायस्कूल. |
| ३१ यादव लक्षुमण | अकोला हायस्कूल. |
| ३२ रामचंद्र नारायण | बाळापुर इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३३ खंडो शामराव | जळगाव इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३४ आपाजी रामचंद्र | अकोला हायस्कूल. |
| ३५ देवराव नारायण. | खामगांव इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३६ शामराव गणेश | अकोट इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३७ माधव रामराव | उमरावती हायस्कूल |
| ३८ नानाजी त्रिंबक | नांदुरा इंग्लिश मराठी स्कूल. |
| ३९ नारायण गोपाळ | मलकापुर इंग्लिश मराठी स्कूल. |
| ४० चुणि ईश्वरदास | इलिचपूर सिटी इंग्लिश मराठी स्कूल. |
| ४१ पुरुषोत्तम राजाराम | अकोट इंग्लिश मराठी स्कूल. |
| ४२ अरदेसर दिनशाजी | इलिचपुर क्यांटनमेंट इं० म० स्कूल नंबर १ |

रा० [illegible] दे[illegible] दार आहेत—येथून शेगा[illegible] [illegible]दुऱ्या पावेतो तांग्याची डाक होती ती कमी केली—ईश्वराचे नामस्मरणा करितां स्थळ व मनुष्य अवश्य आहे याचा विच्यार करण्या करितां येथें स्मालकाज कोर्टाचे क्लार्क रा० येकनाथ मोरेश्वर यांनीं सभा भरविली होती. तींत येक शास्त्री नेमावा व त्यानें संस्कृतांतून कांहीं सांगत जावें असा विच्यार निघाला होता —येथील रेलवेचें काम बहुधा जानेवारी अखेर पुरें होईल असें दिसतें.

उमरावतीस कामदार लोकांची जी परिक्षा झाली ती बरोबर झाली नाहीं. व तींत कित्येक गैर गोष्टी झाल्या असें आम्हांस समजलें आहे त्या विषयीं पुढील अंकांत आम्ही सविस्तर लिहूं.

### अकोला.

सर रिचर्ड टेंपल साहेब हिंदुस्थान सरकारचे प्रधान विलायतेस रजेवर गेले होते ते परत येऊन नववे तारखेस मुंबईहून निघून दहावे तारखेस एथील स्टेशनावरून पुढे गेले. कमिशनर साहेब व इतर मंडळी त्यांस भेटावयास गेली होती.

एथें साहेब लोकांचें भजनालय होणार व त्याच्या पायाच्या दगडाच्या समारंभा करितां मद्रासचे लार्ड बिशप १६वे तारखेस येणार आहेत.

हायस्कुलांतील १७५ रुपयांचे जागेवर नागपुरचे क्युरेटर रा० रा० काशिनाथ परशराम मराठे बी ए यांस नेमिल्याप्रमाणें ते आपले कामावर येऊन रुजू झाले.

मि० हाडन साहेब डिपुटी कमिशनर, मि० निकोलेट साहेब आसि० कमि०, व मि० बर्न साहेब आसि० कमि० यांच्या स्वाऱ्या तालुक्यांतून फिरावयास गेल्या आहेत.

डा० सिंक्लेर साहेब डायरेक्टर व मि० स्क्रार्जी साहेब हायस्कुलाचे हेड मास्तर हे मुंबईस युनिवर्सिटीच्या परीक्षां करितां आज जाणार होते.

दस्तुर बहिमनजी साहेब आसि० कमिशनर यांच्या मातुश्रीनीं मरणसमयीं धर्मार्थ कांहीं रकम काढून ठेविली आहे त्यांतून त्यांच्या इच्छेप्रमाणें बहिमनजी साहेबांनीं एथें पारशी लोकांस भजनपूजनाकरितां एक लहानसें टुमदार मंदीर बांधिलें आहे. व त्याचे अर्चेचा समारंभ आज तीन दिवस चालू आहे. उदईक समाप्ती आहे. बहुत पारशी गृहस्थ त्या करितां एथें आले आहेत. या विषयींची अधिक माहिती पुढील अंकांत लिहू.

म्याट्रिकुलेशनचे परीक्षे करितां अकोल्याहून पाच व उमरावतीहून तीन असामी साल मजकुरीं मुंबईस गेले आहेत.

जंगलखात्याकडील कनसरवेटर साहेबांच्या स्वाऱ्या एथें आल्या आहेत.

एथील नदीच्या पुलाचे कामास एक दोन दिवसांत आरंभ होईल. तुंबवलेलें पाणी सोडून दिलें, लाइन मारून चुन्यांत खुंट्या गाडल्या, व रस्ता रोकला इतकी तयारी झाली आहे.

खामगावचे साहू शेट शामलाल ओंकारदास याजकडे मोठा उत्साह आहे त्याकरितां साहिब लोकांस व इतर कामदार वगैरेस बोलावण्या करितां ते एथें आले आहेत.

### AKOLA HIGH SCHOOL.

FIRST TERM—1869/70.

The First term for 1869-70 will commence on Wednesday, 1st December. Candidates for admission should be present at the Entrance Examination which will be held, in the School Library, on Monday, 2nd instant, at 10.30, A. M.

ही पुरवणी अकोल्यें येथें वऱ्हाडसमाचार

[illegible]ार.
[illegible]F BERAR.
[illegible] 28, 1869 NO. 34
[illegible]८६९ इ० अंक ३४

आम्ही पूर्वी गजेंद्रगडकर आचार्यांस उत्तर दिलें आहे त्याचाही या सभेनें चांगला विचार करावा, त्यांतील मुख्य सार गोष्ट ही आहे कीं, जुना काळ राहिला नाहीं, तें राज्य राहिलें नाहीं, व ते लोकही राहिले नाहींत सर्व बदललें आहे. त्यापक्षीं शास्त्रेंही बदललीं पाहिजेत आणि याप्रमाणें पूर्वीपासून आजपर्यंत बदलित आल्याचें उघड आहे. यास नानाप्रकाचे ग्रंथच साक्ष देतात.

दुसरें आम्ही या प्रसंगीं इतकेंही सुचविण्यास धजतों कीं, पुनर्विवाहोत्तेजकानीं एकाएकी हें काम केलें अथवा अंधारांत केलें असें नाहीं. आज बहुत दिवसांपासून याची वाटाघाट चालून, वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध जाहिराती लागून हें काम झालें आहे तरी जर ही गोष्ट शंकराचार्यांस अमान्य होती तर यापूर्वींच त्यांणीं असें काम करूं नये वगैरेबद्दल आज्ञापत्र प्रसिद्ध करणें योग्य होतें. असें असतां आजवर स्तब्ध राहिल्यानें या मंडळीस "निरुत्तर मित्थेवउत्तरं" याप्रमाणें आचार्य महाराजांचा प्रतिबंध या गोष्टीस न येऊन मान्यताच आहे असें वाटून मंडळीनें माघार घेतली नाहीं. वास्तव आतां आचार्यांनीं आपलें मत देणें प्रशस्त कसें आहे?

आतां आम्ही आपले सत्पक्षाकडील मंडळीस विनंती करितों कीं, सुवर्णास किती भाजून घ्यावें लागतें (ताव सोसावा लागतो) आटून घ्यावें लागतें, पिटून घ्यावें लागतें, कसोटीस घांसून घ्यावें लागतें इतकें सोसून तें आपले स्वरूपांत, गुणांत, व कणांत कमीपणा पावत नाहीं म्हणूनच त्यास मोठेपणा मिळाला आहे व सर्व लोक त्याची इच्छा करून कंठाचेठायींही त्याचें धारण करितात. याप्रमाणें या मंडळीस अशींच संकटें व दुःखें सोसावीं लागणार हें प्रस्तुतच्या चालू चिन्हांवरून उघडच दिसत आहे. तरी त्यांणीं सदरील सुवर्णाची गोष्ट ह्रदयांत धरून सहन केल्यास त्यांचा मोठेपणा आहे. खऱ्या रत्नावर घणाचा घाव बसला तरी तें न फुटतां घणासच खांच पडते- कच्चया, कृत्रिमी व खोट्याची गोष्ट तशी नाहीं त्याजवर घाव बसला कीं, त्याचा चुराडा होऊन जातो व खरें स्वरूप बाहेर पडतें. जशी आमचे वांईकरांची प्रसिद्ध दुक्कल. सारांश अशा कच्या धैर्याचे लोकांच्या नांवानीं याद फुगली व 'देखनेमें दबू आणि चलनेमें शिवराई' असें झालें तर काय उपयोग? यापेक्षां पंडिता सारखे खरे हिरे किती निपजतात तें समजून येण्याचा प्रसंग निकट आला आहे यास्तव ज्यांणीं आजवर हो म्हटलें असेल त्यांणीं माघार घेऊनये चेंगटपणा जों जों अधिक करावा तों तों संशय जास्ती होऊन निश्चयापासून मन डगमगतें. याजकरितां शुभस्य शीघ्रं या म्हणीवर लक्ष्य देऊन विधिपक्षाकडे सत्वर वळावें पुढें काय होतें तें पाहूं असें म्हणून धिमेपणा करूं नये.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV AKOLA :—SATURDAY EVENING, AUGUST 28, 1869 NO. 34

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २८ माहे आगस्ट सन १८६९ इ० अंक ३४

## हिंदुस्थानचा भाग्योदय व चंद्रपुरचे कोळसे.

ईश्वराचे मोठे उपकार मानावे कीं त्यानें आम्हां गरीब हिंदू लोकांस असा मोठा उत्तम फलोत्पादक हिंदुस्थान देश जन्मास दिला. हिंदुस्थानाची लांबी रुंदी अफाट, जमिनी पुष्कळ आणि त्या चांगल्या पिकाऊ, कापुसावर हिंदुस्थानच्या तर इंग्लंड देशाचा गुजारा होतो, शिवाय ऐष आरामाचे जिन्नसहीं हिंदुस्थानांत विपुल, हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं सुवर्णरज सापडतात, गोवळकोंड्याकडे हिऱ्याच्या खाणी देखील आहेत, इकडील मागील राजेही मोठे पराक्रमी आणि नामांकित होऊन गेले. सारांश बहुत तऱ्हेची हिंदुस्थानची संपत्ति आणि श्रेष्ठत्व पाहून हल्लीं नामांकित झालेलीं राष्ट्रेंही लाळ घोटित होतीं हें मनांत आलें म्हणजे मोठें समाधान वाटतें. इतक्यांत त्यामागून दुसऱ्या विच्याराचा ओघ मनांत आला म्हणजे तें समाधान गडबडतें आणि असें वाटतें कीं एक व्यावहारिक विद्या व यांत्रिक कला यांचें ज्ञान आपले देशास कमी झालें तेणेंकरून केवढा मोठा गोता बसला! पहा, लागलीच आपण राजाचे रंक झालों. बहुविध संपत्तींनीं युक्त आपला देश आपण परक्याचे हातांत देऊन त्यांचे दास झालों, आपण ज्या घरांत राहतों त्याखालच्या जमिनीची पण मालकी आपली नाहींशी झाली; आणि हिंदु म्हणजे जंगली, अडाणी, मूर्ख इत्यादि विशेषणें आपणास मिळालीं. आतां त्याचा विच्यार केला तर ही गोष्ट कालमहात्मावरच लोटली पाहिजे असें दिसतें. इंग्लंडासारख्या देशासही दैवगतीनें सोडलें नाहीं मग हिंदुस्थानास तरी तिनें कां सोडावें? या दृष्टीनें पाहिलें तर त्याविषयीं वैषम्य वाटावयास नको. इंग्लंडचे एवढे शहाणे लोक पूर्वी नागवे उघडे फिरत होते व तितका निकृष्ट काल हिंदुस्थानास कधीं आला असल्याचा दाखला नाहीं हें खरें आहे; तथापि प्रथम गरीबी असून नंतर श्रीमंती आली म्हणजे तिचा जुवा चांगला बसत असतो. आणि प्रथम राजकीय भोग भोगून नंतर श्राद्धीय दर्भमोडे भट बनलों म्हणजे वाईट वाटतें. तशी स्थिति आमची झालेली आहे. अस्तु हेही दिवस निघून जातील अशी शांतवनार्थी लोक उमेद देत असतात ती आम्हीं आतां हिंदुस्थानच्या पुढील भाग्योदयाच्या निश्चयावरून कार्यकारणसहित देतों तर येणेंकरून आमचे वाचकास थोडा आनंद होईल असें नाहीं. ती गोष्ट अशी—

व्यावहारिक ज्ञान व यांत्रिक विद्या या दोहोंची कमताई सदरीं आपले हिंदुस्थानास दाखवली गेली. त्या दोन्हीही न्यूनता इंग्रज सरकारचेच कृपेनें आपल्या देशांतून नाहींशा होत आहेत. पहिली विद्यावर्धनाची. तिजविषयीं मागें बहुत वेळां सांगितलें आहे व ज्ञानसंपादनार्थ इंग्लंडांतदेखील आतां लोक जाऊ लागले व विख्यात होऊं लागले यावरून ती प्रसिद्ध आहे. दुसरी यांत्रिक कला प्रसाराची गोष्ट अशी कीं, इंग्लंडांत मुख्यत्वें यांत्रिक ज्ञान वाढलें त्यास मुख्य कारण, तिकडे कोळशाच्या खाणी तशाच लोखंडाच्या खाणी पुष्कळ व चांगल्या सांपडल्या, व तेणें करून आणि तिकडील लोकांच्या उद्योगधर्मेंकरून तें ज्ञानें वाढणें हा त्याचा साहजिक परिणाम झाला. तेव्हां त्याप्रमाणानें पाहतां आपले हिंदुस्थानांतही ईश्वराचे कृपेनें कोळशाच्या व लोखंडाच्या खाणी आहेत असें आतां उद्योगी पुरुषांच्या प्रयत्नानें दृष्टोत्पत्तीस आलें आहे व अंशतः त्यांचा उपयोगही होऊं लागला आहे ही गोष्ट मोठी महत्वाची नव्हे काय?

अयोध्या प्रांतांत लोखंडाच्या खाणी सापडल्या आहेत व लोखंड तयार करण्याचें तिकडे कामही चालू आहे. महाबलेश्वराच्या डोंगरावरही लोखंड दृष्टीस पडतें धावडलोक तेथें अल्पस्वल्प कामही करिताहेत. या प्रमाणें कोळशाच्या खाणी राणीगंजप्रांताकडे लागल्या आहेत व ते कोळसे तिकडील ईस्टइंडिया रेलवेकडे आगगाडीच्या यंत्रास चालूही केले आहेत. त्याचप्रमाणें इकडे चंद्रपुराजवळ कोळशाच्या खाणी पुष्कळ सापडल्या आहेत. व मि० स्मिथ साहेब चंद्रपुरचे डिपुटी कमिशनर असें म्हणतात कीं येथें आसपास दीडहजार मैल क्षेत्रफळांत सर्व कोळशाच्याच खाणी आहेत व तो कोळसा चांगला निघेल आणि बहुत काळ पुरवठ्यास येईल. सरकारानें चंद्रपुरच्या कोळशाच्या खाणीची चांगली परीक्षा पाहण्यास या सालीं २०००० रुपये दिले आहेत. व माहितगार खोदणारे लोक आणून तें काम चालू करविलें आहे. जी. आय. पी. रेलवेच्या आगगाडीच्या यंत्रांत हे कोळसे जाळून पाहिले पण चांगलेसे गुणावह झाले नाहींत म्हणून पुन्हा परीक्षा पाहण्याकारितां तें शास्त्रवेत्त्या पंडितानीं ठरविलें आहे कीं हल्लीं इंग्लंडांतील कोळशाकारितां आगगाडीचें यंत्र ज्या प्रकारचें आहे त्या प्रकारचें हिंदुस्थानचे कोळशास कदाचित चालणार नाहीं सबब वेगळ्या प्रकारचें नवीन एक यंत्र करून हे कोळसे चालवून पाहिले पाहिजेत. व चीफ कमिशनर साहेबाचे विद्यमानें ही तजविज होणार आहे. ईस्टइंडिया रेलवे कडे तर राणीगंजच्या खाणींतील कोळशाकारितां वेगळ्या तऱ्हेचीं यंत्रें केलींच आहेत. व त्यावरून तसें केलें असतां चंद्रपुरचाही कोळसा आगगाडीचे कामास चांगल्या प्रकारें येईल अशी त्यांस उमेद आहे. कृपाळु परमेश्वर ती त्यांची उमेद सफळ करो व हिंदुस्थानाचा त्या योगें त्वरित भाग्योदय होवो.

मि० मारिस साहेब मध्यप्रांताचे चीफ कमिशनर यांनीं आपले रिपोर्टांत लिहिलें आहे कीं, चंद्रपुरचे कोळसे राणीगंजच्या कोळशाच्या प्रतीचे बहुधा ठरावेत असें आहे. आणि तसे ठरले असतां इकडील आगगाड्यांतून इंग्लिश कोळशाचे ऐवजीं त्यांचाच उपयोग केला जाईल. व ते पुष्कळ स्वस्त दरानें मिळतील. चंद्रपुरच्या आणि रेलवेच्या मधला भाग सपाट आहे याजकरितां येथें रेलवेची शाखा अगर ट्रामवे बांधून नेला असतां पुष्कळच उपयोग होऊन सगळ्या पश्चिम हिंदुस्थानांत त्या कोळशांचा फैलावा होणार आहे. गोदावरी नदींतून आगबोटी चालविण्याच्या कामाची तयारी नेथून चालली आहे तें ठिकाणही चंद्रपुरापासून फार दूर नाहीं सबब ही रेलवेची शाखा आणि तें आगबोटी येण्याचें स्थळ यांचें एक स्टेशन झालें म्हणजे या भागांतील कोळसे, लोखंड, कापुस, तांदुळ, भुईमुग, करडी वगैरे तेलाचीं बीजे, आणि इमारत कामाचे उत्तम दगड हे हिंदुस्थानांतील पाहिजे त्या बाजारीं गरज लागेल तेव्हां अगदी सुलभ पणानें नेतां येतील.

आम्ही इच्छितों कीं चंद्रपुर आमच्या वणी जिल्ह्याच्या अगदी हद्दीवर आहे त्याअर्थी कोळशाच्या खाणीच्या शिरा आमच्या वऱ्हाडांतही असोत. व त्या उमगल्या जाऊन इकडेही खाणी खणण्याचें काम चालू होवो व त्या योगें वऱ्हाडचाही भाग्योदय होवो.

## पुनर्विवाहप्रकरण.

(लिहून आलेला मजकूर.)

आलकिडे पुनर्विवाहाच्या विरुद्ध पक्षाकडील लोकांनीं जो भगीरथ प्रयत्न मांडला आहे तो पाहिला असतां मोठेंच आश्चर्य वाटतें. कारण हिंदु लोकांची एवढी एकी आजपर्यंत कोणतेही कामांत नजरेस आलेली नाहीं त्या मानानें हें एक शुभाचिन्ह समजलें पाहिजे, आणि जर हे लोक असेच हरएक कामांत पुढें होऊन विचार करतील तर हिंदुस्थान देशाचे भाग्योदयाचें द्वार उघडलें असें कां म्हणूं नये? व आनंद मानण्यास काय चिंता आहे? पण या जमावाचा रंग तसा आहे असें नाहीं. यांणीं आपलें हें एकत्र केलेलें बळ फक्त अबलांस वैधव्यरूप दुःखडोहांतून तरणोपायास लागण्याचा जो रस्ता निघाला आहे त्याजवर कांटे घालण्याचें कामीं खर्ची पाडिलें आहे. ही मोठे निर्दयपणाची व वाखाणण्यास नालायक अशी गोष्ट आहे.

या लोकांची सभा मुंबईस दर आठवड्यास भरते आणि ज्याअर्थीं जगद्गुरु शंकराचार्य यांजकडून तिच्या साहाय्यार्थ शास्त्रीविभुतीही आली आहे व त्यांणीं वर्तमानपत्रें घेण्याचें सुरू केलें आहे. त्याअर्थीं आमची त्यांस एक मोठी सूचना ही आहे कीं, त्यांणीं मानवीधर्मास व विद्यमान काळास अनुलक्षून जो काय विचार करणें असेल तो करून ठराव करावा. आग्रही मतानें मोठेपणा कधी कोणासही मिळाला नाहीं.

आम्ही पूर्वी गजेंद्रगडकर आचार्यांस उत्तर दिलें आहे त्याचाही या सभेनें चांगला विचार करावा, त्यांतील मुख्य सार गोष्ट ही आहे कीं, जुना काळ राहिला नाहीं, तें राज्य राहिलें नाहीं, व ते लोकही राहिले नाहींत सर्व बदललें आहे. त्यापक्षीं शास्त्रेंही बदललीं पाहिजेत आणि याप्रमाणें पूर्वीपासून आजपर्यंत बदलित आल्याचें उघड आहे. यास नानाप्रकाचे ग्रंथच साक्ष देतात.

दुसरें आम्ही या प्रसंगीं इतकेंही सुचविण्यास धजतों कीं, पुनर्विवाहोत्तेजकानीं एकाएकी हें काम केलें अथवा अंधारांत केलें असें नाहीं. आज बहुत दिवसांपासून याची वाटाघाट चालून, वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध जाहिराती लागून हें काम झालें आहे तरी जर ही गोष्ट शंकराचार्यांस अमान्य होती तर यापूर्वींच त्यांणीं असें काम करूं नये वगैरेबद्दल आज्ञापत्र प्रसिद्ध करणें योग्य होतें. असें असतां आजवर स्तब्ध राहिल्यानें या मंडळीस "निरुत्तर मिथ्यैवउत्तरं" याप्रमाणें आचार्य महाराजांचा प्रतिबंध या गोष्टीस न येऊन मान्यताच आहे असें वाटून मंडळीनें माघार घेतली नाहीं. वास्तव आतां आचार्यांनीं आपलें मत देणें प्रशस्त कसें आहे?

आतां आम्ही आपले सत्पक्षाकडील मंडळीस विनंती करितों कीं, सुवर्णास कितीभाजून घ्यावें लागतें (ताव सोसावा लागतो) आटून घ्यावें लागतें, पिटून घ्यावें लागतें, कसोटीस घांसून घ्यावें लागतें इतकें सोसून तें आपले स्वरूपांत, गुणांत, व कणांत कमीपणा पावत नाहीं म्हणूनच त्यास मोठेपणा मिळाला आहे व सर्व लोक त्याची इच्छा करून कंठाचेठायींही त्याचें धारण करितात. याप्रमाणें या मंडळीस अशींच संकटें व दुःखें सोसावीं लागणार हें प्रस्तुतच्या चालू चिन्हांवरून उघडच दिसत आहे. तरी त्यांणीं सदरील सुवर्णाची गोष्ट हृदयांत धरून सहन केल्यास त्यांचा मोठेपणा आहे. खऱ्या रत्नावर घणाचा घाव बसला तरी तें न फुटतां घणासच खांच पडते. कचेचा, कृत्रिमी व खोट्याची गोष्ट तशी नाहीं त्याजवर घाव बसला कीं, त्याचा चुराडा होऊन जातो व खरें स्वरूप बाहेर पडतें. जशी आमचे वांईकरांची प्रसिद्ध दुक्कल. सारांश अशा कच्या धैर्याचे लोकांच्या नांवानीं याद फुगली व 'देखनेमें ढबू आणि चलनेमें शिवराई' असें झालें तर काय उपयोग? यापेक्षां पंडिता सारखे खरे हिरे किती निपजतात तें समजून येण्याचा प्रसंग निकट आला आहे यास्तव ज्यांणीं आजवर हो म्हटलें असेल त्यांणीं माघार घेऊनये चेंगटपणा जों जों अधिक करावा तों तों संशय जास्ती होऊन निश्चयापासून मन डगमगतें. याजकरितां शुभस्य शीघ्रं या म्हणीवर लक्ष्य देऊन विधिपक्षाकडे सत्वर वळावें पुढें काय होतें तें पाहूं असें म्हणून धिमेपणा करूं नये.

## जंजिरे संस्थान.

हा हबशी सरकारचा थोडासा मुलुख उत्तर कोकणांत आहे. व तेथील नबाब साहेबास दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरे सर्व अधिकार स्वतंत्रपणें आहेत. त्याप्रमाणें देहांत शिक्षेचाही अधिकार त्यांस आहे. या संस्थानास इंग्रज सरकार कारभारी नेमून देणार असा हल्लीं पुकारा झाला आहे त्याचें कारण असें—

नबाब साहेबांचे काबे किल्ल्यांत तीन कैदी त्यांचे पदरचे तीन अमलदारांचे ताब्यांत असतां त्यांनीं त्यांस पळवून राणी सरकारचे मुलखांत जाऊ दिलें. या अपराधावरून त्या तीन अमलदारांस नबाब साहेबानीं ठार मारण्याचे शिक्षेचा हुकूम केला व त्या प्रमाणें दोघांवर ती शिक्षा अमलांत आली व एक बचावला. या गोष्टीचा पुढें बोभाट होऊन इंग्रज सरकारानीं त्या मुलखांत युरोपियन अधिकारी पाठवून तपास केला. तेव्हां त्यांनीं रिपोर्ट केल्यांत त्या दरबारास कारभारी नेमावा असा अभिप्राय दिला आहे असें ऐकतों.

कैदी कोणत्या स्वरूपाच्या गुन्ह्याचे अपराधी होते, व त्यांस पळवून लावणाऱ्या लोकांनीं कोणत्या प्रकारें बुद्धिपूर्वक उत्तेजन व सहाय देऊन नबाब साहेबांस क्षोभविलें हें आम्हांस आमच्या बातमीदारानें अजून लिहिलें नाहीं तरी कैदीस पळून जाऊ दिलें या गुन्ह्यास देहांत शिक्षा गैरवाजवी आहे असें आम्ही म्हणतों व त्याकरितां इंग्लिश सरकारांनीं त्यांस एकवार चेक द्यावा म्हणजे समजूत द्यावी. व देहांत शिक्षेचा त्यांचा स्वतंत्र अधिकार रद्द करावा असाही आमचा अभिप्राय आहे. परंतु कित्येक नेटिव संस्थानिकांस पूर्वापार देहांतशिक्षेचे हक्क दिलेले आहेत व त्यांचे राज्यांत पूर्वापार कायदे कानू वगैरेचे विशेष नियम नसल्यामुळें राजांचे मर्जीमाफक शिक्षा होतात असें अन्यत्रही आढळतें. थोड्या वर्षांमागें बडोद्याचे महाराजानीं दोसुमियास हत्तीच्या पायीं बांधून मारविलें होतें व त्याचा मोठा बोभाटा झाला होता परंतु तेवढ्या करितां इंग्रज सरकारानीं तेथें कारभारी नेमण्याचा ठराव केला नाहीं व त्यांस समजूत दिली त्याच प्रमाणें जंजिऱ्याचे लहानसें संस्थानासही सरकारानें समजूत द्यावी व तीही पाहिजे तर खरपूस द्यावी पण तसें न करितां एकदम कारभारी नेमून त्यांच्या अधिकाराचें हरण करावें हें प्रशस्त नाहीं असा आमचा अभिप्राय आहे.

## रेलवेचे नवे रस्ते.

( THE NEW RAILWAY SCHEME. )

माजी गवरनर जनरल सर जान लारेन्स यांणीं, हिंदुस्थानचे सेक्रेटरी आव स्टेट यांजकडेस, हिंदुस्थानांत रेलवेचे नवे रस्ते करण्याच्या बाबतींत मोठें डिसप्याच (रपोट) पाठविलें आहे. या डिसप्याचमध्यें शिफारस केल्याप्रमाणें बहुत करून सोईसोईनें रेलवेचीं कामें सुरू होतील असें वाटतें. सर जान लारेन्स यांणीं असें लिहिलें काहे कीं, आजपर्यंत हिंदुस्थानांत रेलवेचीं जीं कामें झालीं तीं बहुतकरून कंपन्यांचें मार्फत झालीं. पुढें असें करू नये. होईल तेथपर्यंत रेलवेचीं कामें सरकारानें आपण होऊन करावीं. निदान जा रेलवेच्या सडका नेटिव संस्थानांतून जातील त्या सडकांचे नेटिव संस्थानांतून जाणारे भाग तरी कंपन्याकडून मुळींच करवू नयेत कारण नेटिव संस्थानांशीं रेलवे कंपन्याचा स्वतंत्र संबंध ठेवणें बराबर नाहीं. सर जान लारेन्स यांणीं दुसरें असें लिहिलें आहे कीं, रेलवेच्या सर्व सडका धरून हिंदुस्थानांत हल्लीं सुमारें ५,००० मैल रेलवे झाली आहे व आणखीं निदान १०,००० मैल रेलवेचा रस्ता झाला म्हणजे सरासरी मुख्य मुख्य लैनी तयार होतील. हा जो नवीन दहा हजार मैल रस्ता करणें तो आजपर्यंत रेलवेचें काम होत आलें त्या मानानें पाहिलें असतां, होण्यास तीस वर्षें लागतील. हे नवे होणारे रेलवेचे रस्ते यांविषयीं अजून जरी पुष्कळ चाटाघाट व्हावयाची आहे व कदाचित यांत थोडा बहुत फेरफार होण्याचा जरी संभव आहे तथापि हे रेलवेचे रस्ते हिंदुस्थानच्या कोणच्या भागांत व कोठून कोठपर्यंत होणार याची वाचकांस साधारणतः माहिती असावी ह्मणोन आम्ही पुढील हकीकत लिहिली आहे.

सर्वांत अगोदर "इंडस व्हाली रेलवे" ही रेलवेची सडक व्हावयाची आहे. ही सडक सिंधु नदीच्या काठानें सिंध व पंजाब या प्रांतांतून जावयाची. ही सडक बांधण्यांत सोय अशी आहे कीं, एक तर सिंध आणि पंजाब प्रांताचा व्यापार खुला होईल. व दुसरें पंजाब प्रांत हा हिंदुस्थानचें नाकें आहे व पंजाबास कराची हें बंदर नजीक यानकरितां प्रसंगीं विलायतेहून लष्कर अथवा दुसरें सामान परभारें आणणें झाल्यास तें कराचीहून पंजाबांत रेलवे मार्गानें नेण्यास फार सोईचा व नजीकचा रस्ता पडणार आहे.

रजपुताना रेलवे,—हा रस्ता अमदाबादेहून, अजमीर व जयपुरावरून दिल्लीस व आग्र्यास जाऊन मिळावयाचा. दुसरी सडक खंडव्यापासून इंदुरावरून अजमीरपर्यंत न्यावयाची. ह्या दोन्ही सडका नेटिव संस्थानांतून जात असल्यामुळें एक तर बंदोवस्ताच्या कामीं उपयोगी पडण्यासारख्यां आहेत व दुसरें माळव्यांतलि अफू आणि रजपूत स्थानांतील मीठ आणि अफू यांच्या व्यापारास या सडकांच्या योगानें मोठी सोय होणार आहे.

अयोध्या प्रांतांत कुमायून येथें लोखंड निपजतें तेथपर्यंत सडक न्यावयाची आहे. बंगाल्यांत दार्जीलिंग ह्मणोन साहेब लोकांचें हवाखाण्याचें ठिकाण आहे तेथपर्यंत २१० मैल लांबीची रेलवेची सडक करण्याविषयीं लिहिलें.

"ईस्टकोस्ट रेलवे" ही सडक हिंदुस्थानच्या पूर्वकिनाऱ्यावर कलकत्यापासून मद्रासेपर्यंत व मद्रासेपासून पांडिचरीपर्यंत करण्याचा विचार आहे. याशिवाय मद्रास इलाक्यांत दुसऱ्या दोन तीन सडका बांधण्याविषयीं माजी गवरनर जनरल सर जान लारेन्स यांणीं डिसप्याचमध्यें लिहिलें आहे.

"वेस्ट कोस्ट रेलवे" ही सडक हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर व्हावयाची. या सडकेचा दक्षिण भाग कालिकतपासून कोचिनपर्यंत व्हावयाचा. व या सडकेचा उत्तर भाग समुद्र किनाऱ्यानें कारवारच्या दक्षिणेस व उत्तरेस सुमारें चाळीस चाळीस अथवा पन्नास पन्नास मैल होऊन शिवाय कारवार बंदरापासून धारवाडपर्यंत व्हावयाची.

ग्रेटइंडियनपेनिनसुला रेलवेचे दोन फाटे, एक पूर्वेस व एक उत्तरेस असे गेले आहेत. हे फाटे पुण्याच्या पलीकडील धोंड स्टेशनापासून मनमाडपर्यंत आडवी सडक बांधून जुळावे अशी सर जान लारेन्स साहेबांनीं शिफारस केली आहे. ही सडक सुमारें १३२ मैल लांबीची होईल.

अमदाबादेपासून विरमगांव आणि वधवनपर्यंत व काटेवाडामधून दुसरी एक सडक बांधण्याविषयीं लिहिलें आहे.

निजाम सरकारच्या राज्यांत कलबुर्ग्यापासून हैदराबादेपर्यंत सडक बांधावी म्हणोन लिहिलें आहे.

सदरहु सडकांपैकीं मुलतानपासून सक्करपर्यंत, आमदाबादेपासून वधवनपर्यंत, दिल्लीपासून अजमिरावरून इंदूर मार्गानें खंडव्यापर्यंत, धारवाडपासून कारवाडपर्यंत, आणि कलबुर्गापासून हैदराबादेपर्यंत, यांचें काम अगोदर सुरू करण्याविषयीं हुकूम आला आहे.

ने॰ ओ॰

## Local
## वऱ्हाड.

अकोटास लायब्ररी स्थापन होण्याची खटपट चालली आहे व या कामीं तेथील तहशिलदार रा. रा. गोविंदराव यशवंत हे झटत आहेत व त्यांचे प्रयत्नानें सुमार ७०० रुपयांची टीप होईल असें आहे. त्याच प्रमाणें पोलिस इन्स्पेक्टर मि॰ बाळकरामजी, स्कुलमास्तर मि॰ केशवराव, व चीफ मि॰ बलदेव सिंव्ह यांसही या गोष्टीचें अगत्य आहे. तेव्हां आतां हे कार्य किती त्वरेनें व कोणत्या प्रकारचें होतें पाहू. तहशिलदारासारख्यांनीं अशा कामांत पडणें हें त्यांस भूषण व इतरांस हौस आणि उत्तेजन येण्यास कारण आहे—या तहशिलदारानीं तेथें एक धर्मशाळा चांगली बांधविली आहे—अकोटचे पोस्ट आफिसांत पुन्हा गोंधळ होऊन चौकशीकरितां मि॰ गोपाळनारायण सब इ॰ गेले आहेत—तेथें मि॰ बलदेव सिंव्ह चीफ कानस्टेबल गेल्यापासून बंदोबस्त चांगला आहे.

**उमरावती**—हवा गार होऊन गेली आहे. बहुतेक पूर्व वऱ्हाडांत मुबलक पाऊस पडला. पिकें उत्तम प्रकारचीं आहेत. तुरळक ठिकाणीं गोळीचा आजार आहे.

बसंता वरील कापसाचा भाव कांहीं उतरला आहे. हल्लीं भाव ११५ पासून ११७ चलनीनें आहे. सु॰ प्र॰

इलिचपूर—गेल्या आठवड्यांत पर्जन्यानें चांगली बहार केली ; व आणखी ही पडण्याचें चिन्ह दिसत आहे. हवेंत गारपणा नसून उष्णता आहे. पिकें उतम स्थितींत आहेत. धान्याचे भावांत अजून कांहीं फेर फार नाहीं. शहरांत व छावणींत आजार थोडा असल्याचें समजतें.

एथील वकील रा॰ रा॰ गोविंदराव आनंदराव यांस गेल्या शुक्रवारीं देवाज्ञा झाली.

इलिचपुरास डाका घालणारे सात लोकांस मि॰ आलेक्झांडर साहेब फुलपावर-मांजिस्त्रेट यांणीं, दोन दोन वर्षें सक्तमजुनिशीं कैद व ३०० रुपये दंड व दंड न दिल्यास आणखी सहा महिने कैद अशी शिक्षा दिली.

मोर्सीचे माजी मयत तहशिलदार सदाशिव राजाराम यांचे घरीं ४०१५ रुपयांची चोरी झाली; पोलीस वरूड मुकामी चौकशी करित आहे.

एथील मिस्तर सुभराय मुदलियार यांस फारेस्ट खात्यांत ५० रुपयांची जागा मिळाली.

एथील जेल दरोगे आणि त्यांचा कारकून यांस कमीकरून त्यांचे जागीं इंग्रजी व मराठी जाणणारा मनुष्य नेमणार असें ऐकितों.

एथील डिपुटी कमिशनर साहेबाचे जुडिशियल शिरस्तेदार रा॰ रा॰ रामराव हणमंत यांस भरपगारावर तीन महिन्यांची रजा मिळून ते तारीख ११ रोजीं रजेवर निघून गेले; त्यांचें काम तूर्त रा॰ रा॰ रामचंद्र महिपत खारकर हे पाहात असतात.

सु. प्र.

## अकोला.

महेश्वर हरी खरे जे मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध होते. व देउळगाव राजाचे मुकदम्यांत मि॰ गोविंद विठ्ठल करकरे बारिस्टर यांचे बरोबर दुभाषेपणाचे कामाकरितां गुदस्तां दोन वेळां अकोल्यास आले होते ते कोकणांत गुहागर एथें आपले घरीं कांहीं दिवस आजारी पडून या महिन्याचे सातवे तारखेस मरण पावले. याविषयीं नगरच्या वृत्तवैभवांत खालील अभिप्राय लिहिला आहे.

मृत्यू—आमचे परम स्नेही रा॰ रा॰ महेश्वरहरि खरे, एथील अदालतींतील माजी शिरस्तेदार, ह्यास सुमारें पंधरादिवसांमागें तालुके गुहागर जिल्हा रत्नागिरी एथें देवाज्ञा झाली. ही वार्ता ऐकून पुष्कळांस वाईट वाटेल. या नगर शहरांत त्यांनीं दोन दिवस मोठ्या ऐश्वर्यांत चांगले घालविले. व तितक्यांत त्यांनीं पुष्कळांचें बरें केलें, दिवा म्हणजे जो लोकांस उजेड देणारा, त्याचे खालींही अंधार असतो, मग मनुष्याच्या आंगीं कांहीं दुर्गुण असेल तर कांहीं नवल नाहीं. महेश्वरहरीच्या खासगी संबंधाच्या सर्व गोष्टी एकीकडे ठेवून ह्या प्रसंगीं आम्हीं असें म्हणतों कीं, त्या सारिखा फर्डा कारकून, पांच हजारांतही मिळेल किंवा नाहीं ह्याचा संशय आहे. कोणत्याही मनुष्या विषयीची साक्ष त्याच्या मित्रानें दिली तर तिच्या सत्यतेविषयीं संशय घेण्यास कारण राहतें. परंतु तशीच साक्ष जर त्याच्या प्रतिपक्षी मनुष्याची पडली, तर ती खरी खरी खरी, असें त्रिवार म्हटलें पाहिजे. आमचे सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, महेश्वरावर ज्या साहेबांची वक्रासाखी कडक मर्जी, त्यांनीं देखील "महेश्वरासारखा कारकून नाहीं" असें कितिएक वेळां म्हटल्याचें आम्हास समजलें आहे. हा गृहस्थ मंडळीचा शोकी, गुलहौशी, उदार, आणि देखण्यांत चांगला होता व ह्याचें वय सुमारें ३० वर्षांचें होतें.

शाळाखात्याची कांपिटिटिव परिक्षा अकोल्यास न होतां उमरावतीस होईल. मागें सतत दोन वर्षें अकोल्यास परिक्षा झाली म्हणून गुदस्तां व सालमजकूर अशीं दोन वर्षें उमरावतीस होत आहे. या परिक्षेची तारिख मागें आमच्या अंकांत आक्टोबर महिन्याची २७ वी लिहिली गेली होती ती चुकली आहे. परिक्षेकरितां तारीख २० माहे आक्टोबेर ही मुक्रर केली आहे.

येथें या आठवडयांत युरोपियन लोकांचा क्रिकेट प्ले म्हणजे चेंडूदांडू वगैरेचा खेळ झाला. पूर्व वऱ्हाडापैकीं साहेब लोकांची एक बाजू व पश्चिम वऱ्हाडापैकीं सोहब लोकांची दुसरी बाजू होती. यामुळें साहेब लोक बरेच जमून त्यांच्यांत खाणें, पिणें खेळणें बागडणें, वगैरे मौज झाली.

यखेळाकरितां युरोपियन लोक बाहेरून येथें आले होते ते मेजर नेंभार्ड साहेब कमिशनर पुर्व वऱ्हाड, क्या० बेल साहेब डिपुटी कमिशनर उमरावती, क्या० मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर बुलढाणा, मे० लेन साहेब पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल, मि० राइटसाहेब पो० सु० उमरावती, मि० कंबरलेन साहेब पो० सु० यवतमाळ इत्यादि.

गेल्या मंगळवारीं दिवसां व रात्रीं पर्जन्य पुष्कळ पडला. नदीस पाणीही पुष्कळ आलें होतें. बुधवारीं बोट चांगली चालली नाहीं. अर्ध्या नदींतूनही कामदार मंडळी परत आली. बोटींत पाणी येत होतें. पुली नीट नव्हती. व त्यामुळें एकदा बोट पालथीही झाली. दैवयोगानें बोटवाल्याशिवाय आंत कोणीं मनुष्यें नव्हतीं. व ते पोहून पार गेले. यासंबंधी काम पहाणारे अधिकारी अशी अव्यवस्था न राखतील तर फार चांगलें.

काळूराम नावाच्या सोनारानें जेलदरोग्याची जागा आपणास मिळावी म्हणून जेलरास २०० रूपये लांच देण्याची खटपट केली. त्याबद्दल त्यावर व दोघा साक्षीदारावर खटला होऊन त्यांस तीन तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली.

एकझिक्युटिव इंजिनियर आफिसांतील ड्राफ्समेन रा० विष्णुरामचंद्र भट यांस फर्स्ट ग्रेड सब ओव्हरसियर नेमिलें.

एथें उमरावतीहून अपा क्षीरसागर यानांवाचे एक वैद्य आले आहेत. हे जातीचे लिंगाईत असन या देशच्या वैद्यक ग्रंथाचा त्यांचा अभ्यास व हुशारी आणि चपलता बरी दिसून येते तर अकोल्याच्या गृहस्थ मंडळीनीं त्यांस त्यांच्या निर्वाहापुरती सोय करून अवश्य ठेवून घ्यावें असें आम्हांस वाटतें. यांस मराठी भाषाही चांगली येते.

एथील चीफ कानस्टेबल मि० कासमखायास खामगावास नेमिलें. व एथें, त्यांचे जाग्यावर बाळापुरचे मि० किसन शिंग यांस नेमिले; व बाळापुरास मि० खाजे हपीस उदीन यांस नेमिलें.

मि० डेविस सोहब खजिन्याबरोबर मुंबईस गेले आहेत— पोलिस सुपरइंटडेंट मि० जेमसन साहेब सु० पुण्याकडे रजेवर गेले आहेत— व मि० लेडलो साहेब लोकलफंड इंजिनियर मुंबईस गेले आहेत.

बुलढाण्याचे लोकलफंड एजंट मि० रामचंद्र राव क्रिकेट खेळाचे संबंधानें च्यार दिवस एथें आले होते.

## Epitome of News.

## वर्तमानसार.

काबुळ—मयत अमीर साहेबांचा मुलगा अबदुल अजीज खान यास कंदाहारास कैद करून काबुलास पाठविल्याविषयीं लिहून आलें आहे. तसाच बुखाऱ्याच्या शहाचा मुलगा काबुला कडे गेला आहे. तिकडे जाण्या विषयीं त्याच्या बापाचें अनुमत नव्हतें.

आस्ट्रेलिया देशातून अलीकडे सरकारानें घोडे किती आणिले याचें टिपण कलकत्याच्या कस्टम कलेक्टराकडे मिळालें आहे तें असें—

| | | घोडे. |
|---|---|---|
| सन | १८६३ | १०२० |
| " | १८६४ | ३६९ |
| " | १८६५ | ६६१ |
| " | १८६६ | १०२५ |
| " | १८६७ | ८९९ |
| " | १८६८ | ११९८ |
| | | ५३७८ |

टाइम्स आफ इंडियाचे एडिटर मि० नाइट साहिब व प्रोप्राइटर मि० मूल साहेब यांचा पुन्हा एक प्रकरणाविषयीं वाद पडला आहे. नाइट साहिबानीं इकानमिस्ट नावाचें पुस्तक काढिलें आहे तें काढण्यास त्यांच्या करारनाम्यावरून त्यास हक्क नव्हतों असें मूल साहेबांचें म्हणणें आहे. नाईट साहेब म्हणतातकीं करारनाम्यावरून मुंबई इलाख्यांत दुसरें वर्तमानपत्र चालविणें, किंवा त्यास लिहिणें याची मनाई आहे. पुस्तकास ती गोष्ट लागू नाहीं. या वादाचा परिणाम काय होतो पहावें. करारांत एक लक्ष रुपयांची अट आहे.

बंगाल्याकडील बाबु केशव चंद्रसेन पुढील वर्षाचे आरंभास विलायतेस जाणार असल्याचें वर्तमान आहे.

अबिसीनियाच्या थिओडोर राजाचा मुलगा अलामेयो हिंदुस्थानांत आला आहे त्यास पोटखर्चास व विद्याभ्यासास दरमहा ५०० रूपयांचीं नेमणूक केली आहे.

मुंबईचे लार्ड बिशप डिसेंबर महिन्यांत सिंध कराचीकडे जाणार आहेत.

जबलपुराजवळील नर्मदेचा रेलवे पूल चांगला तयार झाला. व पुष्कळ ओझ्यानें लादलेली आगगाडीची माळ त्यावरून चालवून पाहिली. या पुलाचें काम कित्येक वर्षें चाललें होतें.

रजपुतान्यांत सिरोही म्हणून संस्थान आहे तेथील राजांस आपले संस्थानाची व्यवस्था पाहातां येईना म्हणून इंग्रज सरकारानें बारा वर्षे पर्यंत त्या संस्थानाचा राज्यकारभार आपण पाहण्याचा ठराव केला आहे.

सर ए स्पेन्सर साहिब मुंबई इलाख्यास नवीन कमांडर इनचीफ झाले व ते गेल्या महिन्याचे ३१ वे तारखेस बिलायतेहून इकडे यावयास निघाले आहेत. तेव्हां लार्ड नेपियर साहेब हल्लींचे क० इनचीफ या आठवडयांत जातील असें दिसतें.

गुदस्त सालांत मुंबई, कारवार आणि कराची मिळून बाहेर देशी कापसाचे १२९४२९१ बोजे रवाना झाले.

येका परगण्यांतील येका जातीचे लोकांनीं पंजाबाकडे हजारा प्रांतांत येका गावाची लूट केली व तो गाव जाळला याजकरितां हिंदुस्थान सरकारचे परमाणगीनें पंजाब सरकारानें त्या परगण्याची नाकेबंदी करून त्यांचा कोंडमारा करण्याचा ठराव केला आहे.

कराचीस आक्टोबर महिन्याचे १८ वे तारखेस लहानसें प्रदर्शन व जत्रा होणार आहे.

जनावरें, पक्षी वगैरे सरकारी कामदारांनीं कोणाकडून बक्षीस घेऊ नयेत असा एके प्रकरणावरून नवीन ठराव झाला आहे.

विलायतेस तारायंत्रांतून बातमी पाठविण्यास जो खर्च लागतो तो पुढील वर्षापासून कमी होऊन २० रूपयांवर येणार- असें मद्रासेकडील पत्रांत लिहिलें आहे.

कलकत्याच्या इंडियन डेलीन्यूस पत्रावर कोर्टाच्या बेअदबीची फिर्याद झाली आहे.

मारवाडा कडील दुष्काळ फंडाची बेरीज १६५५९ रुपये झाली आहे व पुढें चालू आहे.

नवा स्टांप आक्ट हिंदुस्थान सरकारानें या महिन्याचे १३ वे तारखेस मंजुर केला व त्यावर सन १८६९ चा १८ वा नंबर पडला.

कलकत्यास ब्रम्हसमाज नामें हिंदु लोकांच्या नवीन धर्मपंथाचें येक देवालय तयार झालें आहे. त्यांतील प्रथम प्रवेशाचा समारंभ गेल्या आठवडयांत मोठा उत्साहपूर्वक झाला. या कामाकरितां ९००० रुपये वर्गणी जमली होती.

पुण्यास लार्ड नेपियर साहेब मुंबईचे कमांडर इन चीफ यांस ते विलायतेस जाणार म्हणून साहिबलोकांकडून आज रोजीं मोठी टोलेजंग मेजवानी होणार आहे.

कलकत्यास येका सोजिरानें दारूचे अमलांत येका नेटिवास गोळी घालून ठार मारिलें. त्याची चौकशी होऊन त्यास काळे पाण्याची शिक्षा झाली.

रेलवेचें उत्पन्न—कोणते रेलवेवरून किती मैल आगगाडी चालू आहे व सन १८६९ चे पहिले तीन महिन्यांत त्यांस काय काय उत्पन्न झालें त्याचें टिपण—

| | मैल | रु० |
|---|---|---|
| ईस्टइंडियन मेन रेलवे | ११३१ | ७०९४३९ |
| जबलपुर रेलवे | २२३ | ३०९२४ |
| जी आय पी रेलवे | ८७४ | ४९९९५० |
| बडोदा रेलवे | ३०७ | १३०४०९ |
| इस्टर्न बंगाल रेलवे | ६१३ | ४३००६ |
| मद्रास सौथवेस्ट रेलवे | ४९२ | ९४८२३ |
| मद्रास नार्थ वेस्ट रेलवे | १८५ | २३०८६ |
| दिल्ली रेलवे | १७४ | ३०७२६ |
| सिंध रेलवे | १०७ | ११८०४ |
| अयोध्या व रोहिलखंड रे० | ४२ | ५९८० |
| पंजाब रेलवे | २४६ | २९५४० |
| ग्रेट सदर्न आफ इंडिया रेलवे | १६८ | १६३४६ |
| | ४०९० | १६३३०७१ |

आफ्रिका खंडाच्या काठावर ३५० गुलाम सापडले ते मुंबईस आणिले. व तेथील पोलिस कमिशनरांनीं त्यांतील कांहीं शरणपुरच्या उद्योगशाळेंत पाठविले. व कांहीं थोरथोर लोकांचे घरी चाकर दिले.

कच्छचे राव आपले राज्यांत इंग्लिश पध्धतीच्या सुधारणा करित आहेत.

मारवाड प्रांतांत दुष्काळानें इतकीं जनावरें मरण पावली कीं या वर्षीं बहुधा अर्धे जमीनीचे मात्र पेरे होतील.

कमोन अयर्न वर्क्स—या नावाचा लोखंडाच्या खाणी खणण्याचा व लोखंड तयार करण्याचा कारखाना उत्तर हिंदुस्थानांत नैनीतालच्या नजीक सुरु आहे. व त्याकरितां एक कंपनी आहे व तिचें भांडवल दोन लक्ष रुपये आहे. तेवढयानें काम चांगलें चालत नाहीं सबब सरकारानें त्यांस मदत करण्याचें कबूल केलें आहे. व अयोध्या आणि रोहिलखंड रेलवेची तेथपावेतों एक शाखा करण्याचेंहि विलायत सरकारानें सांगशन केलें आहे.

मुंबईस म्याट्रिकुलेशनची परिक्षा नोवेंबरचे १५ वे तारखेस होणार, सालमजकुरीं कांहीं दुरुस्ती झाली. विद्यार्थ्यांनीं अर्जामध्यें आपला जन्मदिवस मराठी मानाप्रमाणें तिथीनें व इंग्रजी मानाप्रमाणें तारखेनें लिहून कळविला पाहिजे असा ठराव झाला आहे.

रा० रा० मोरोबा कानोबा यांनीं हायकोर्टांत वकीलीचें काम करण्याची सनद मिळविली.

कळवांतिणी व कसबिणी यांपासून इनकमटॅक्स घेण्याची माफी झाली.

मुंबई इलाख्यांत आगष्टचे ९वे तारखेपावेतों पाऊस किती पडला त्याचें टिपण. मुंबई ९१ इंच, ठाणें ५८, कल्याण ४७, रत्नागिरी ४५, वेंगुर्ले ६६, सावंतवाडी-७२, कारवाड ७४, सुरत २०, भडोच १२, बडोदें ११, धुळें ५.॥ नगर, १५, नाशिक १२, पुणें १६, सोलापुर १३, सातारा २४, महाबलेश्वर ९३, कोलापुर १३, बेळगाव ३२, आणि धारवाड १७, इंच.

---

नोटिस—छोगमल्ल वल्लद आगरचंद व हिवाटदार केसरमल्ल दुकान मौजे कळमशेरे तालुके पाचोरे जिल्हा खानदेश यांस नोटिस देणार केशव यादव वकील छावणी अकोलें मौजे कळमशेर येथें आमची जागा असून त्या जाग्यावर गोविंदा वल्लद बहिरू हाटकर हा राहत असून ती जागा तुम्ही आपल्या घेण्यांत जप्त करविली आहे. आणि त्या जाग्याचा हरास तुम्ही तारीख ७ माहे सप्टेंबर सन १८६९ इसवी रोजीं करविणार म्हणून आम्हास आमचें घरचें पत्र आल्यावरून तुम्हास या नोटिशीनें कळविण्यांत येतेकीं गोविंदा राहतो ती जागा आमची आहे. तिजवरून तुम्ही ही नोटिस पावतांच जप्ती दूर करावी व हरास महकूब करावा. असें न केल्यास आणि आमची जागा हरास तुम्ही करविल्यास जी आमची नुकसानी होईल ती सर्व तुम्हापासून या नोटिशीचे खर्चासुद्धां फिर्याद करून भरून घेण्यांत येईल हें आपणास कळावें. ता० २८ आगष्ट १८६९ इ०
(सही) केशव यादव वकील.

ठाणें— रविवारापासून पाऊस फार उत्तम पडत आहे या योगानें चवदा आणे तरी पीक होईल अशी भरपूर आशा आहे. हवा चागली गार झाली आहे. रोगराई सांगण्या सारखी नाहीं. अ० द०

—रत्नागिरी जिल्ह्यापैकीं एक दोन ठिकाणच्या कसबिणींनीं आपल्या मुलींस तेथील शाळेंत घेण्याविषयीं अर्ज केला त्यावरून या बाबतींत सरकार पर्यंत काम चालून शेवटीं कसबिणीच्या मुली शाळेंत घेऊं नये असा शेवटचा निकाल झाला असें कळतें. ने० ओ०

आम्हास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, डिपुटी कलेक्टरांच्या नेमणुका नवीन व्यवस्थे प्रमाणें सरकारानें केल्या. त्यांत रा० रा० शंकर पांडुरंग पंडित ह्यांस कलादगीस नेमिलें. हे मुंबई युनिवर्सिटीपैकीं, एम.ए असून दक्षिणाप्रैस कमिटीचे चिटणीस होते. सरकारानें ही चांगली निवडणुक केली ह्यांत संशय नाहीं. मि० द०

—नवीन झालेल्या ठरावाप्रमाणें डेपुटी कलेक्टरांच्या जागेची शिस्तवारी होणार म्हणोन पुष्कळ दिवसांपासून वार्ता होती त्याप्रमाणें गेल्या आठवड्यांतील गवर्मेंट ग्याझेटांत नेमणुका छापून प्रसिद्ध झाल्या त्या येणेंप्रमाणें. जांच्या नावावर + अशी खुणा घातली आहे. ते सध्या डेपुटि कलेक्टर नसून दुसऱ्या जागेवर आहेत असें समजावें. व ज्याच्या नावासमोर (हु. डे.) अशी खुणा घातली आहे त्यांस हुजूर डेपुटि कलेक्टर व जांसमोर (डि. डे.) अशी खुणा आहे त्यांस डिस्ट्रिक्ट डेपुटि नेमिलें आहे असें समजावें.

वर्ग पहिला. जागा ४ पगार ७००

नांव. जिल्हा

मि० नाना मोरोजी+
मि० एच. इंगल हु. डे. कारवाड.
मि० पेस्तनजी जहांगीर+
मि० जे. एफ. फर्नानेंडझ हु. डे. अमदाबाद

वर्ग दुसरा. जागा ९. पगार ६००
यांपैकीं दोन जागा भरल्या नाहींत.

मि० ए. डब्यू. ह्यूज+
मि० जगजीवनदास खुशाल दास हु. डे. सुरत.
मि० कुवरजी कावसजी हु. डे. ठाणे.

वर्ग तिसरा. जागा ९ पगार ५००
यांपैकीं एकजागा भरली नाहीं.

मि० आय. ड्रेकप हु. डे. धारवाड
मि० फ्रामजी नसरवनजी डि. डे. खेडा
मि० विष्णु परशराम डि० डे. बेळगांव
मि० ए. एच प्लंकेट हु. डे. नाशिक

वर्ग चवथा. जागा. १०. पगार ४००
यांपैकीं एक जागा भरली नाहीं.

मि० राघोबा जनार्दन हु. डे. अहमदनगर
मि० नवरोजी बयरामजी हु. डे. बेळगांव
मि० रामचंद्र अमृत दुगल हु. डे. रत्नागिरी
मि० उमेदराम अनंदराम डि. डे. सुरत
मि० विनायक दिवाकर डि. डे. खानदेश
मि० चुणिलाल वेणीलाल हु. डे. खेडा.
मि० जे. हर्न हु. डे. सातारें
मि० बळवंत लक्ष्मण } रत्नागिरीच्या कलेक्टरचे दफतर दार
मि० आपाजी रामचंद्र } सुरतेच्या कलेक्टरचे दफतरदा

वर्ग पांचवा. जागा १२ पगार ३००
यांपैकीं दोन जागा भरल्या नाहींत.

मि० विष्णू मोरेश्वर+
मि० धनजी भाई कावसजी डि. डे. सातारे
मि० टी. ई. काईट+ हल्लीं सार्सिड आहेत.
मि० माहादाजी विष्णू बर्वे डि. डे. धारवाड
मि० जे. एडवर्डस हु. डे. खानदेश
मि० माणकजी कावजी हु. डे. भडोच.
मि० उमेदराम रणछोडदास डि. डे. भडोच.
मि० प्राणलाल मथुरादास डि. डे. पंचमहाल.
मि० नागोबा सोनोबा हु. डे. पुणें.
मि० सी. डब्यू. रिचर्डसन हु. डे. कलादगी

जांच्या नावावर+ अशी खुणा आहे त्यांच्या जागांवर नेमणुका केल्या आहेत. त्या.

मि० लक्ष्मण जगन्नाथ हु० डे० सोलापुर
मि० अदरजी जीवनजी हु० डे० कुलाबा
मि० नारायण गणेश साठे } ठाण्याच्या कलेक्टरचे दफतरदार.
मि० ई० पियर्सन डि० डे० ठाणे.
मि० शंकर पांडुरंग डि० डे० कलादगी.

नोटिस—रघुनाथदास लक्षुमणदास व हिवाटदार दौलतराम दुकान खामगांव तालुके मजकूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचें ओझें मुंबईस पडलें आहे तें तुम्ही घ्यावें. आजपावेतों आम्ही भाडें खर्च करून अमानत ठेविलें आहे तें ओझें पुढें गेल्याआल्यास आम्ही त्याचे जबाबदार नाहीं. ओझ्याचें जें भाडें पडेल तें तुम्हास द्यावें लागेल हें समजावें.

तारिख १८ अगस्ट सन १८६९ इ०

(सही) गंगाधर जोरावरमल साहू
दुकान अकोला

## जाहिरात.

## मुदतीसंबंधी तिन्ही इलाख्यांचे हायकोर्टांचे निवाडे.

सर्व लोकांस कळावें कीं, आम्ही मुदतीचे कायदे व इतर आक्ट यांजवर आजपर्यंत मुंबई, कलकत्ता, व मद्रास यांतील हायकोर्टांनीं ठराव केले आहेत त्यांचा उपयोगापुरता सारांश समजण्याजोगा फक्त मुदती प्रकरणीं व ते ठराव कोणते ग्रंथांत कोणते पानांत सांपडतील त्याविषयीं प्रत्येक ठरावावर खुलासा होण्याकरितां नंबर-तारीख, सन व त्या ग्रंथाचें पान याप्रमाणें लिहिलें आहे. या ग्रंथाची रचना अशी केली आहे कीं, ज्याज्या आक्टाचे ज्या ज्या कलमावर हायकोर्टानें ठराव दिला आहे. त्या त्या आक्टाचीं कलमें लिहून त्या कलमा खालींच ठराव, नंबरवार, व तारिखवार लिहिले. आहेत. फक्त सन १८५९ चा आक्ट १४ वरच झालेले ठराव लिहिले नाहींत. इतर आक्टावर मुदती संबंधीं केलेलेही लिहिले आहेत. एक कलमावर आजपर्यंत किती ठराव झाले आहेत हें चांगले रितीनें समजावें म्हणून प्रथम मोठे अक्षरानीं कलम लिहून त्याचे खालींच त्या कलमावरचे सर्व ठराव लिहून नंतर दुसरें कलम या प्रमाणे ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथांत खालीं लिहिलेल्या बुकांपैकीं ठराव आहेत.

१ मुंबई हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून वाल्यूम ५ भाग २ पर्यंत.

२ मद्रास हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून ३ पर्यंत.

३ कलकत्ता उइकली रिपोर्ट वाल्यूम १ पासून १० पर्यंत.

४ शिवाय कितीएक वर्तमानपत्रांतील ठराव.

हे सर्व निवाडे मिळून सुमारें चारशें अगर साडेचारशें होतील.

अशा प्रकारचा ग्रंथ आजपर्यंत झाला नाहीं दिवाणी खात्यांतील न्यायाधीश व वकिल लोक व वकिलीचे परिक्षेंत जाणारे उमेदवार यांस याग्रंथापासून फारच उपयोग होईल, यांत संशय नाहीं. हें बूक छापण्याचें काम सोलापूर येथें कल्पतरू छापखान्यांत शिळाप्रेसावर सुवाच्य अक्षरांनीं जाड कागदावर चतुष्पत्री सांचाचें सुरू केलें आहे. वर्गणीदारांस हें बूक ता० १५ डिसेंबर सन १८६९ चे आंत मिळेल हें बूक सर्वांस सोईवार मिळावें म्हणून आगाऊ किंमत ३ रूपये शिवाय टपाल खर्च ०४ व मागाहून रूपये ४ व टपाल खर्च याच प्रमाणें ठेवला आहे तर ज्या लोकांची बुकें घेण्याची इच्छा असेल त्यांणि ता० १५ माहे सपटेंबर सन १८६९ चे आंत रूपये पाठविल्यास आगाऊ असें समजलें जाईल. हे रूपये आमचे नांवें वर्गणीदारांनीं आपले नांव पत्यासुद्धां लिहून पाठवावें म्हणजे बुक तयार होतांच त्यांजकडे रवाना करण्यांत येईल. टिकिटा पाठविल्यास वर्ताळ्या सुद्धां पाठविणें. हें बूक दोनतीन वकिलांचे मदतीनें निघणार आहे, सबब सर्व लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

तारिख १५ माहे आगष्ट सन १८६९ इसवीं. } विश्वनाथ नारायण सहस्त्रबुद्धे वकील कोर्ट अदालत जिल्हा सोलापूर.

## क्रिमिनल प्रोसिजर कोड.

प्रोसिजर कोड सन १८६१ चा आक्ट २५ हा सुधारण्याबद्दल नवीन सन १८६९ चा आक्ट ८ झाला आहे त्यावरून पूर्वीच्या पैकीं पुष्कळ कलमें रद्द झालीं आहेत सबब पूर्वीच्या आक्टा पैकीं चालू कलमें व हल्लीं नवीन झालेलीं कलमें एकंदर करून आम्ही आपले छापखान्यांत शिलाप्रेसावर चतुष्पत्री सांचाचे छापण्यास आरंभ केला आहे. सदहू बुकाची किंमत रुपये २ आगाऊ ठेविली आहे. मागाहून जास्त किंमत पडेल. या बुकास समजुतीचा कागद जोडलेला सुद्धा मिळेल. हें बुक माहे सपटंबर सन १८६९ अखेर वर्गणीदारास बांधून तयार मिळेल. पत्र पाठविणारांनीं सोलापुर येथें "कल्पतरू" छापखान्यांत किमतीचे पैशासुद्धां अगर टिकिटें पाठविणें- झाल्यास अर्धा आणा वर्ताळ्यासह पाठविले असतां बुक तयार होतांच रवाना करण्यांत येईल. किमती शिवाय टपालखर्च पडेल.

ता० ८ माहे आगष्ट सन १८६९.

कल्पतरूचे मालक.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास दोन वर्षे होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररूपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ४ |
| फुटकळ … … … | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें